रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ • अंक ११२
www.ramprahar.com

शुक्रवार, ८ नोव्हेंबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

परदेशी पक्ष्यांचे मुंबईच्या खाडीकिनारी आगमन/२

श्रीवर्धन मतदारसंघात दोन राष्ट्रवादीमध्ये लढत/५

भारत वि. आफ्रिका आज पहिला टी-२० सामना/८

## आम्ही जे बोललो, ते करून दाखवले -मुख्यमंत्री



**अकोला :** लाडकी बहीण योजनेला महाविकास आघाडीने तीव्र विरोध केला. आम्ही जे बोललो, ते करून दाखवले. या योजनेचे पाच हप्ते दिले. मविआ सरकारप्रमाणे हप्ते घेणारे नव्हे, तर महायुतीचे सरकार लाभार्थ्यांना योजनेचे हप्ते देणारे आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लक्ष्य केले. बाळापूर मतदारसंघातील वाडेगाव येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत मुख्यमंत्री बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार अनुप धोत्रे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. त्या वेळी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी महायुती सरकारने राबवलेल्या योजनांची माहिती देत विरोधकांवर निशाणा साधला. ते म्हणाले, महायुतीचा विकासाचा अजेंडा आहे. एकदा दिलेला शब्द मागे घेत नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभांचा आजपासून महाराष्ट्रात धडाका



**नाशिक : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसभांचा धडाका राज्यात शुक्रवार (दि. ८)पासून सुरू होत आहे. पंतप्रधान मोदींच्या सभांचा आरंभ उत्तर महाराष्ट्रातून होणार असून ८ नोव्हेंबरला नाशिक व धुळे येथे सभा होतील.

नाशिक पंचवटीतील तपोवन मैदानावर दुपारी पंतप्रधान मोदींची पहिली जाहीर सभा होणार आहे. या सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह उत्तर महाराष्ट्रातील भाजपचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. महायुतीचे जिल्ह्यात मालेगाव मध्य वगळता एकूण १४ उमेदवार आहेत. तेदेखील या वेळी उपस्थित राहणार आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी महायुतीच्या वतीने नाशिक येथे होणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या जाहीर सभेची जय्यत तयारी केली जात आहे. सभेला एक लाख जण उपस्थित राहण्याचा अंदाज असून त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. या तयारीचा आढावा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दृकश्राव्य माध्यमातून घेतला.

चार दिवसांत पंतप्रधान मोदींच्या नऊ प्रचारसभांचे नियोजन करण्यात आले असून आणखी काही सभांचे नियोजन करण्याचा प्रयत्न आहे. ८ नोव्हेंबरला नाशिक व धुळे, ९ नोव्हेंबर रोजी अकोला व चिमूर, १३ नोव्हेंबर रोजी सोलापूर व कोल्हापूर आणि १४ नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई व मुंबई या ठिकाणी पंतप्रधान मोदींच्या सभा होणार आहेत. सभा यशस्वी करण्यासाठी भाजपसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते कार्यरत आहेत.

# संविधानाबद्दल राहुल गांधींची अनास्था

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आरोप



**नागपूर : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी नागपूर येथे आयोजित संविधान सन्मान संमेलनात केलेल्या भाषणावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली. एकूणच भारताच्या संविधानाबद्दल राहुल गांधींची अनास्था बुधवारी पहायला मिळाल्याचा आरोप उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. ते गुरुवारी (दि. ७) माध्यमांशी बोलत होते.

राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत बहुसंख्य कडव्या आणि डाव्या विचारांच्या संघटना, व्यक्ती सहभागी आहेत. या लोकांमार्फत राहुल गांधी हे देशात अराजकता पसरवत असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केला होता. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान म्हटले की वास्तविक निळ्या रंगाचे स्मरण होत असताना राहुल गांधी हातात लाल रंगाचे संविधानाचे पुस्तक घेऊन फिरत आहेत. या सर्व गोष्टींमधून त्यांना काय सुचवायचे आहे ते स्पष्ट होत असल्याचा आरोपही फडणवीस यांनी केला होता.

राहुल गांधी नेहमी एक पुस्तक आपल्याला दाखवत असतात. संविधानाचा सन्मान केलाच पाहिजे, पण मग लाल संविधान का? लाल संविधान दाखवून तुम्ही कुणाला इशारा देत आहात? संविधानाचा अर्थ असो ऑर्डर आणि एनआरकेचा अर्थ असतो डिसऑर्डर. तुम्ही अराजक पसरवत आहात का? त्यामुळे संविधान आणि भारत जोडोच्या नावाखाली अराजकता परवणाऱ्या लोकांना एकत्र करून समाजात विद्वेष निर्माण करण्याचे काम याठिकाणी होत आहे, असा घणाघात फडणवीसांनी केला तसेच अर्बन नक्षलवाद यापेक्षा वेगळा नाही. देशाच्या एकतेला आणि एकात्मतेला धोका निर्माण करण्याचे काम राहुल गांधींच्या माध्यमातून होत आहे, असा आरोपही या वेळी त्यांनी केला.

नागपूर विमानतळावर गुरुवारी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, माझा आरोप खरा ठरलाय, लाल पुस्तक हातात घेऊन राहुल गांधी संविधानाचा गौरव करू इच्छित नाही, तर त्यांच्यासोबत असलेल्या अर्बन नक्षलसोबत असलेले फुटीरतावादी आहेत त्यांना एक प्रकारचा इशारा देण्याकरिता, त्यांची मदत घेण्याकरिता ते नाटक आणि नौटंकी करत आहेत. संविधानाचा रोज ते अवमान करत आहेत. पुढे त्यांनी आजपर्यंत काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आणि संविधानाचा अवमान केलाय, आता त्यांच्या या नौटंकीला कोणीच भुलणार नाही, असेही म्हटले.

## दाऊद, बिश्नोईच्या फोटोंचे टी-शर्ट; विक्रेत्यांवर गुन्हा दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम आणि तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई या दोघांचे अनुकरण करणारे टी-शर्ट आणि वापरातील वस्तूंची विक्री होत असल्याच्या घटना उघडकीस आल्यानंतर सायबर गुन्हे विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. संबंधित वस्तूंची ऑनलाइन विक्री करणाऱ्या ई कॉमर्स वेबसाईटवर पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोई हे नाव पुन्हा चर्चेत आले, तर अभिनेता सलमान खानच्या घरावरील गोळीबारामुळे बिश्नोई गँगकडूनच सिद्दीकींची हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दाऊद व बिश्नोई यांचे छायाचित्र असलेले टी-शर्ट प्रिंट करून त्याची विक्री होत असल्याचे दिसून येताच महाराष्ट्र सायबर विभागाने या घटनेची गंभीर दखल घेत संबंधित ई-कॉमर्स वेबसाईट व विक्रेत्यांविरुद्ध कारवाई केली आहे.

# विकासकामांमुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रॅलीला मतदारांचा उदंड प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टीतून पनवेल विधानसभा क्षेत्रात विकासाचे महापर्व निर्माण झाले. पंधरा वर्षांपूर्वी ग्रामीण भागात विकास पहायला मिळत नव्हता, परंतु आमदार प्रशांत ठाकूर यांनी या विधानसभेचे नेतृत्व स्वीकारल्यापासून शहराबरोबरच ग्रामीण भागातही विकासकामांचा आलेख चढता राहिला आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ होत असलेल्या रॅलीला उदंड प्रतिसाद लाभत असल्याचे चित्र पहायला मिळाले.

खुटारी, रोहिंजण, किरवली, धानसर, धरणा, धरणा कॅम्प, पिसार्वे, तुर्भे, करवले, तळोजे मजकूर, कोयनावेळे, घोट व पेंधर येथे प्रचारार्थ रॅली आली असता तेथील ग्रामस्थांनी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.


पनवेल मतदारसंघाचे सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून संपूर्ण जबाबदारीने आमदार प्रशांत ठाकूर कार्यरत आहेत. नगराध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी खऱ्या अर्थाने पनवेलला विकासकामांची ओळख करून दिली. तेव्हापासून विधायक कार्य करत त्यांनी कामाचा झपाटा कायम ठेवला. त्यामुळे कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टीतून पनवेल विधानसभा क्षेत्रात विकासाचे महापर्व निर्माण झाले.

राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व देत जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांना ओळखले जाते. सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम त्यांच्याकडून कायम पहायला मिळते. नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करतानाच लोकांना अपेक्षित असलेला शहरासह ग्रामीण भागाचा विकास त्यांच्याकडून झाला आहे. त्यामुळे त्यांच्या रॅलीला मतदारांचा सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या रॅलीमध्ये भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, (पान २ वर..)

## निवडक

### सलमाननंतर आता शाहरुख खानला धमकी; गुन्हा दाखल



**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता सलमान खाननंतर आता शाहरुख खानला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी मुंबईतील वांद्रे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी धमकीचा कॉल ट्रेस केला तेव्हा तो छत्तीसगढमधील रायपूर येथून केला गेला असल्याचे निष्पन्न झाले. फैजान असे आरोपीचे नाव असून त्याला पकडण्यासाठी पोलिसांचे एक पथक रायपूरला रवाना झाले आहे.

### पोक्सो केस परस्पर मिटवता येणार नाही!

**नवी दिल्ली :** दलित अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाला आता खटल्याला सामोरे जावे लागणार आहे. २०२२च्या या प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाने दोन्ही पक्षांमधील कराराच्या आधारे खटला रद्द केला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय चुकीचा ठरवत रद्द केला आहे. अशा परिस्थितीत आरोपी शिक्षकाला कनिष्ठ न्यायालयात खटल्याला सामोरे जावे लागेल.

# विकासाची स्पर्धा करता येत नसल्याने विरोधकांकडून जाती-धर्माचा आधार

### दिशाभुलीला जनता बळी पडणार नाही -आमदार महेश बालदी



**उरण : रामप्रहर वृत्त**

निवडणुकीच्या माध्यमातून लोकांच्या आयुष्यात परिवर्तन घडवण्याची व विकासाची स्पर्धा करणे आवश्यक असते, मात्र जेव्हा विकासाची स्पर्धा करता येत नाही तेव्हा विरोधक जात, धर्म, भाषा, पंथाचा आधार घेतात. केवळ राजकीय हेतुपुरस्सर जातीची ढाल पुढे करून विरोधक दिशाभूल करीत असले तरी जनता बळी पडणार नाही, असा विश्वास महायुतीचे उमेदवार व उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्र पक्ष महायुतीचे आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ केंद्रीय सहकार व नागरी हवाई उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची जाहीर सभा १५ नोव्हेंबर रोजी पनवेलजवळील करंजाडे येथे होणार आहे. तत्पूर्वी ९ नोव्हेंबर रोजी उलवे नोड व १० नोव्हेंबरला मोहोपाडा येथे सभा होईल, तर १७ नोव्हेंबरला उरण येथे सभा होणार आहे.

सर्वत्र प्रचाराची धूम सुरू असून हजारोंच्या संख्येने उपस्थित असणारी कार्यकर्त्यांची संख्या विरोधकांना पाहवत नाही. त्यामुळे बुडत्याला काडीचा आधार मिळवण्यासाठी केवळ जातीपातीच्या राजकारणाचा केविलवाणा प्रयत्न विरोधकांकडून केला जात असल्याची टीका आमदार महेश बालदी यांनी केली.

माझ्या प्रतिस्पर्धी उमेदवारांकडे विकासाचा अजेंडा नाही. ते फक्त जात, धर्म, भाषा, पंथ व प्रादेशिक मुद्दे पुढे करतात. हा मारवाडी आहे का? आमच्या जातीचा आहे का? असे म्हणून ते माझी जात काढतात, मात्र २१व्या शतकात लोकांना विकास आवडतो. आपल्याकडे व्हिजनरी नेता असावा हा सर्वसामान्य मतदारांचा विचार असतो. त्यामुळे लोक मला विकासाच्या दृष्टीने निवडून देतील, असा विश्वासही महेश बालदी यांनी व्यक्त केला.



# कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासाठी मित्रपक्षही सरसावले!

### पीआरपीकडून विजयाचा निर्धार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना चौथ्यांदा विजयी करण्यासाठी सर्व मित्र पक्षांनी आपली ताकद लावली आहे. या अनुषंगाने ज्येष्ठ नेते जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीची बैठक गुरुवारी (दि. ७) पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाली.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली विकासकामे तसेच महायुतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहचवण्याचा आणि आमदार प्रशांत ठाकूर यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार या वेळी करण्यात आला.

या बैठकीला लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे, पनवेल तालुका अध्यक्ष विद्यानंद जाधव, युवा अध्यक्ष सचिन तांबे, गणेश मार्केट विक्रेता संघाचे सदस्य विलास जाधव यांच्यासह पीआरपी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## छटपूजा उत्साहात



**अलिबाग :** येथील समुद्रकिनारी गुरुवारी छटपूजा उत्साहात साजरी करण्यात आली. (छाया : जितू शिगवण)

## काँग्रेसकडून बंडखोरांची सहा वर्षांसाठी हकालपट्टी

**नागपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील नेत्यांनी मनधरणी करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही रामटेक, कसबा, शिवाजीनगर आणि पर्वती विधानसभा मतदारसंघात बंडखोरी करणाऱ्या काँग्रेसच्या उमेदवारांना काँग्रेसकडून नोटीस बजाविण्यात आली होती. त्यानंतरही अर्ज माघार न घेतलेल्या आणि बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे.

रामटेक विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री राजेंद्र मुळक, काटोलमधून काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार, पर्वती विधानसभा मतदारसंघातून आबा बागुल, सांगली विधानसभेसाठी काँग्रेसने पृथ्वीराज पाटील यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या जयश्री पाटील आणि कसबा विधानसभा मतदारसंघातून कमल व्यवहारे यांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले असल्याची माहिती काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिली.

# साजगावची यात्रा १२ नोव्हेंबरपासून



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

कोकणातील जत्रांचा हंगाम आता सुरू होत आहे. रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी आणि सलग पंधरा दिवस चालणाऱ्या खोपोलीजवळील साजगावच्या बोंबल्या विठोबा यात्रेला कार्तिकी एकादशी (१२ नोव्हेंबर)पासून सुरुवात होत आहे.

दिवाळीपर्यंत कोकणात भाताची कापणी पूर्ण होते. धान्य घरात येते व त्याच्या विक्रीतून शेतकऱ्यांकडे पैसा जमतो. अशातच कार्तिकी एकादशीला पंढरपुरची यात्रा सुरू होते, त्याच दिवसापासून खोपोलीतील साजगावच्या यात्रेला सुरुवात होते. ज्या भाविकांना पंढरपूरला जाता येत नाही, ते धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साजगावच्या यात्रेमध्ये येऊन देवदर्शन घेतात.

साजगावची यात्रा सुकी मासळी, मिठाई विशेषतः जिलेबी शेव, पाळणे, खेळणी, बैल व घोंगडी बाजारासाठी प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर गृहोपयोगी भांडी, शेतीची अवजारेही विक्रीसाठी असतात. या यात्रेतून मोठी आर्थिक उलाढाल होते व स्थानिकांना रोजगार मिळतो. यंदा ही यात्रा २६ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

### 'बोंबल्या विठोबा'चा इतिहास

सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराज हे मिरचीचा व्यवसाय करीत असताना साजगाव येथील डोंगरावर येऊन पैशांची वसूली करण्यासाठी बोंब (हाक) मारीत असत अशी आख्यायिका सांगितली जाते. यावरून या यात्रेला बोंबल्या विठोबाची यात्रा म्हणून ओळखले जाते. डोंगरावरील मंदिर, नयनरम्य परिसर यामुळे साजगावची यात्रा प्रसिद्ध झाली. रायगडसह राज्यातील लाखो भाविक या यात्रेला हजेरी लावतात.

# नांदेडमध्ये ५४ टीएमसी पाणी आणणार

## ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रचार सभेत आश्वासन

**नांदेड : प्रतिनिधी**

पुढील काळामध्ये नांदेडमध्ये उच्च पातळी बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनामध्ये स्थिरता येणार आहे, तसेच परिसरामधील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी आम्ही नांदेडमध्ये ५४ टीएमसी पाणी गोदावरी नदीच्या खोऱ्यामध्ये आणणार आहोत, असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड येथे नागरिकांना दिले. महायुतीचे उमेदवार भिमराव केराम यांच्या प्रचारार्थी सभेमध्ये ते बोलत होते.



ते पुढे बोलताना म्हणाले, भीमराव केराम यांच्या प्रचारासाठी आपण एकत्र आलो आहोत. या पंचवार्षिक काळामध्ये पहिल्या २.५ वर्षात एक रुपयाचा निधी महाविकास आघाडी सरकारने दिला नाही, मात्र महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर केराम यांनी हजारो कोटींची कामे मतदारसंघामध्ये केली आहेत. इथून पुढेदेखील आपलेच सरकार येणार आहे, त्यामुळे आता चिंता करायचे काम नाही. आता पाच वर्षांसाठी सरकार आल्यानंतर किनवट मतदारसंघातील एकही काम शिल्लक ठेवणार नाही, असे आश्वासनसुद्धा त्यांनी मतदारांना दिले आहे.

पहिल्या २.५ वर्षात एक रुपयाचा निधी महाविकास आघाडी सरकारने दिला. आपले सरकार आल्यानंतर हजारो कोटी रुपयांचे काम भीमराव केराम यांनी केले. त्यामुळे आता चिंता करायचे काम नाही सरकार आपलेच येणार आहे. आता पाच वर्षासाठी सरकार आल्यानंतर किनवट मतदारसंघातील एकही विकासकाम रखडवून ठेवणार नाही, असे आश्वासन या वेळी फडणवीस यांनी दिले आहे.

**दुष्काळासाठी उपाययोजना आखणार**

नांदेड तसेच किनवट मतदार संघामधील पाणीप्रश्नाबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले, मराठवाडा हा कायम दुष्काळी भाग म्हणून नोंद झाले आहे, मात्र येणाऱ्या काळामध्ये मराठवाड्याच्या या पिढीने दुष्काळ पाहिला. पुढच्या पिढीला आम्ही तो पाहू देणार नाही. गोदावरी नदीच्या खोऱ्यामध्ये पाणी आणण्याचे काम सुरू केले आहे. ते लवकरच पूर्ण करून आम्ही शेतकऱ्यांच्या तसेच नागरिकांच्या जीवनातील पाणीप्रश्न कायमचा सोडवणार आहे असेही सांगितले. निम्न पैनगंगा धरण केले तर ९५ गावे बुडणार आहेत. म्हणून तो निर्णय मी बदलला आहे. या ९५ गावाला मी विस्थापित होऊ देणार नाही. पंतप्रधान मोदींनी सांगितले आहे, देवेंद्र, एकनाथ शिंदेजी चिंता करू नका. लागेल तो पैसा देऊ. मराठवाड्यात ८० हजार कोटींची गुंतवणूक आणली आहे, असेही त्यांनी सांगितले.

# वाकडाई देवीचे दर्शन घेऊन माणगावात ना. आदिती तटकरेंचा प्रचार सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावचे ग्रामदैवत वाकडाई देवीचे दर्शन घेऊन महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांनी बुधवारी (दि.६) शहरातील विविध वॉर्डातून आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. या प्रचारादरम्यान त्यांनी, महायुती सरकार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी राबविणार असल्याचे सांगितले.

गाव बैठकीत त्या पुढे म्हणाल्या, तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने मला महायुतीच्या सरकारमध्ये एकमेव महिला मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. माणगाव शहरातील जे काही प्रलंबित प्रश्न असतील तेदेखील आचारसंहितेनंतर आपण मार्गी लावू. मला आपण सर्वांनी येत्या २० नोव्हेंबरला



घड्याळ निशाणीसमोरील बटन दाबून मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन केले.

या वेळी शिवसेनेचे राज्य प्रवक्ते ॲड.राजीव साबळे, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, ज्येष्ठ नेते सिराज परदेशी, जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगरसध्यक्ष हर्षदा सोंडकर, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, माणगाव शहर राष्ट्रवादी अध्यक्ष नितीन वाढवळ, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, सचिन बोंबले, राजेश मेहता, नगरसेवक दिनेश रातवडकर, नगरसेविका लक्ष्मी हिलम, ममता थोरे, राष्ट्रवादीचे तालुका अल्पसंख्यांक सेल उपाध्यक्ष महामूद धुंदवारे, मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते, माजी अध्यक्ष सरफराज अफवारे, लियाकत परदेशी, माजी नगरसेवक बाबुराव निंबाळकर, हेमंत शेट, सुमित काळे, सौरभ खैरे, तुळसा पवार आदींसह वॉर्डातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपचा शरद पवार गटाला धक्का

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नाने अनेकांचा प्रवेश

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकासकामांना प्रभावित होत बेलापूर मतदारसंघातील समाजसेविका स्मिता फराकटे-पाटील व डॉ. संतोष खंबाळकर यांच्यासह अनेक महिलांनी भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला.



आमदार मंदा म्हात्रे यांचे नवी मुंबईमध्ये होत असलेली विकासकामे तसेच त्यांच्या माध्यमातून विविध उपक्रमाचे आयोजन करून विविध योजनेच्या माध्यमातून नागरिकांना लाभ दिला जातो. या सर्व गोष्टींचा विचार करून महिला भगिनींनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. महिलांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी गेल्या अनेक वर्षे आमदार मंदा म्हात्रे यांनी जे महत्त्वपूर्ण काम केले आहे ते वाखाणण्याजोगे आहे.

जेव्हा जेव्हा पक्षाने जबाबदारी दिली त्या त्या वेळी पदाला न्याय देण्याचे काम आमदार मंदा म्हात्रे यांनी केले आहे. सर्व आम्ही महिला आमदार मंदा म्हात्रे यांची ताकद दाखविण्यासाठी एकत्र आलो आहोत, असे समाजसेविका स्मिता फराकटे-पाटील यांनी सांगितले.

# मतदानासाठी सुट्टी न दिल्यास आस्थापनांवर कारवाई!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर व उपनगरातील सर्व व्यवसाय, महामंडळे, कंपन्या व संस्था, तसेच इतर आस्थापनांमध्ये कार्यरत कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना निवडणुकीत मतदानासाठी २० नोव्हेंबर रोजी सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांच्या मालकांविरोधात कडक कारवाई केली जाईल, अशी इशारा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिला.

भारत निवडणूक आयोग तसेच मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या सूचनांनुसार मुंबई शहर व उपनगरांत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर, मुंबई शहर आणि दोन्ही उपनगरांतील मतदारांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी विविध नियम जारी करण्यात आले आहेत. विधानसभा निवडणुकीत प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्याबाबत गगराणी यांनी आदेश दिले आहेत.

# नावंढेवाडी येथील आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

साधू वासवानी मेडिकल सेंटर खंडाळा, साधू वासवानी मिशन पुणे संस्था तसेच बियॉन्ड बॉर्डर या सामाजिक संस्थेतर्फे गुरुवारी (दि.७) खालापूर तालुक्यातील नावंढेवाडी गावात आरोग्य तपासणी शिबिर झाले. या शिबिरात शेकडो ग्रामस्थांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतल्याने आयोजकांचे आभार मानले.



या वेळी साधू वासवानी संस्थेचे संचालक लाल आडवाणी, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल गुरव, वैद्यकीय अधिकारी डॉ.केशरसिंग पाटील, लॅब टेक्निशियन शैलजा भांगरे, अश्विनी पाठारे, बाजीराव शिर्के, रामदास गायकवाड, रवी जानकर, राजेश कदम, बीयॉन्ड बॉर्डर संस्थेचे फारुख शेख तसेच ऑस्ट्रेलियामधील डॉ.मेसी थॉमस, डॉ.जोजा, डॉ.ग्रेस, डॉ.हेअली, डॉ.कोब्बी, डॉ.मेयात, डॉ.क्रेसिन आदींसह नावंढे ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

या शिबिरामध्ये सर्दी, खोकला, ताप, पोटदुखी, अंगदुखी, सांधेदुखी, अशक्तपणा, पोटातील जंतू त्वचारोग तपासणी करीत इतर तक्रारींवर मोफत तपासणी करीत औषधोपचार देत मार्गदर्शन करण्यात आले.

# परदेशी पक्ष्यांचे मुंबईच्या खाडीकिनारी आगमन

**मुंबई : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही ऑक्टोबरअखेरीस परदेशी पाहुण्यांचे नवी मुंबई, ठाणे आणि मुंबईच्या खाडीकिनारी आगमन झाले आहे.

गेले काही दिवस फ्लेमिंगो आणि इतर विदेशी पक्ष्यांच्या थव्यांनी शहरांलगतच्या हिरवळ तसेच पाणथळ परिसराच्या सौंदर्यात भर घातली आहे. फ्लेमिंगोंचे आगमन अद्याप मोठ्या संख्येने सुरू झालेले नाही, तरीही इतर काही विदेशी पक्ष्यांचा खाडीकिनारी विहार सुरू आहे. यात ब्लू-टेलेड् बी-इटर आणि ब्लू-चिक्ड बी-इटर या पक्ष्यांचा समावेश आहे.

नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा देशीविदेशी पक्ष्यांच्या स्थलांतराचा काळ मानला जातो. ऑक्टोबरअखेर या विदेशी पक्ष्यांच्या आगमनास आरंभ होतो. हे पक्षी हजारो किमी अंतर कापून नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई परिसरात येतात. पक्ष्यांसाठी आवश्यक खाद्या तसेच विस्तीर्ण पाणथळ जागा उपलब्ध असल्याने सैबेरिया आणि रशिया तसेच इतर देशांतून हे पक्षी स्थलांतर करून खाडीकिनारी येतात. यात प्रामुख्याने फ्लेमिंगो, सीगल, बी ईटर, समुद्री गरूड तसेच ओपन हेड बील हे पक्षी आढळून येतात.

# आमदार दळवी यांच्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांचा प्रचार सध्या ग्रामीण भागात सुरू असून ग्रामीण भागातून लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

तालुक्यातील आंबोली ग्रामपंचायत, शीघ्रे, वावडुंगी व तेलवडे या ग्रामपंचायतीमध्ये जोरदार प्रचार करण्यात आला. या वेळी उमेदवार महेंद्र दळवी यांचे प्रचारपत्रक सर्व ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे काही भागात प्रचारसभासुद्धा घेण्यात आल्या.

या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे यांनी ग्रामस्थांना आवाहन केले की, गावाच्या विकासासाठी आमदार महेंद्र दळवी यांना दुसऱ्यांदा संधी देणे आवश्यक आहे. लोकांची आपुलकीने चौकशी करून त्यांची समस्या तातडीने सोडवण्यासाठी आमदार हे नेहमीच कार्यतत्पर राहिले आहेत. खोट्या प्रचाराला बळी न पडता आमदार दळवी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी



करण्याचे आवाहन केले.

शिवसेनेचे रायगड जिल्हा संघटक दिनेश मिणमिने यांनी, लोकांचे प्रश्न सजगपणे सोडवणारा लोकांना मदतीचा हात देणारा व विकासकामात नेहमी अग्रेसर असे व्यक्तिमत्व म्हणून आमदार महेंद्र दळवी असून त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन केले.

प्रचारसभेस तालुका संघटक यशवंत पाटील, मनोज कमाने, माजी सरपंच व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित कासार, भाजप तालुकाध्यक्ष शैलेश काते, माजी सभापती आशिका ठाकूर, किशोर धामणस्कर, आदेश भोईर, अमित गायकर, दिपेश वरणकर, निलेश ताबडकर, मदन भोईर, काशिनाथ पाटील, विकास दिवेकर, रवि वाघमारे, सतोष पाटील, राजू जमादार, नितीन कमाने, संदिप गायकर, जनार्दन हाटे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिवाळी सुटीत तुळजाभवानी मंदिर संस्थानला ७६ लाख उत्पन्न

**धाराशिव : प्रतिनिधी**

दिवाळी सुट्ट्या असल्याने अनेकजण तुळजाभवानी दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन भाविकांनी मंदिराच्या दानपेटीत रक्कम टाकली असून चार दिवसांत तुळजाभवानी मंदीर संस्थानच्या उत्पन्नात तब्बल ७५ लाख रुपयांची भर पडली आहे. यामध्ये सर्वाधिक ५४ लाख रुपये सशुल्क तसेच व्हीआयपी दर्शनातून मिळाले आहेत.



सण उत्सव काळात अनेकजण देवदर्शनाला जात असतात. यात दिवाळी उत्सवाच्या सुट्ट्या असल्याने याची संधी साधत अनेकांना देवदर्शनाला लाभ घेताना. दरम्यान दिवाळी सुट्ट्यांच्या कालावधीत महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. लाखो भाविक या काळात तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येऊन गेले आहेत. दर्शन घेण्यासोबतच काहींनी रोख रोख रक्कम स्वरूपात दान केले आहे, तर व्हीआयपी दर्शनाची सुविधा असल्याने त्याचे शुल्कदेखील मंदिर संस्थानला प्राप्त झाले आहे.

पान १ वरुन

## विकासकामांमुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रॅलीला मतदारांचा उदंड प्रतिसाद

जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, माजी नगरसेवक संतोष भोईर, भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते चाहूशेठ पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे, विनोद पाटील, संतोषबुवा पाटील, विनोद घरत, समीर कदम, प्रकाश खैरे, किरण पाटील, अशोक साळुंखे, लीना म्हात्रे, जयश्री म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, रविकांत म्हात्रे, श्रीपाद पाटील, दिनेश पाटील, विश्वनाथ पाटील, वैजनाथ पाटील, सचिन पाटील, हरीशेठ पाटील, सुरेश पोरजी, जितेंद्र पोरीजी, नरेश पोरजी, काळूराम गोंधळी, प्रकाश पाटील, दिलीप पाटील, संजय कदम, मनोहर कदम, शेखर कदम, वंदना कदम, राजेश महादे, भाविक महादे, संजय म्हात्रे, दिलीप पाटील, भास्कर तरे, नारायणबुवा, गोपीनाथ पाटील, वासुदेव मढवी, संतोष मढवी, रमेश मढवी, मदन पाटील, सरपंच गोपाळ पाटील, माजी सरपंच राम पाटील, जगन पाटील, नितेश पाटील, वैभव भोईर, निहाल कदम, संतोष पाटील, ऋषाल पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास या ध्येयाप्रमाणे काम करीत असून पनवेलचा जास्तीत जास्त विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे, अशी ग्वाही महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी दिली.

# कणकवलीत आरबी बेकरीला आग

## इतर दुकानांनाही झळ; ८३ लाखांचे नुकसान

**कणकवली : प्रतिनिधी**

शहरातील पटवर्धन चौकातील आरबी बेकरीला शुक्रवारी (दि.७) पहाटे ४ वा. च्या सुमारास आग लागली. यात बेकरी बेचिराख झाली. शेजारील मेडिकल व व्यापारी राजू गवाणकर यांचे ऑफिसही आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. या अग्नितांडवामुळे मोठा हाहाकार उडाला.

शहरातील नागरिकांच्या मदतीने तसेच कणकवली, कुडाळ, मालवण येथील अग्निशमन बंबाच्या सहाय्याने सुमारे तीन तासांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. आगीत बेकरी, मेडिकल स्टोअर्स, खाजगी ऑफिस, चहाची टपरी व भाजी व्यापाऱ्यांच्या स्टॉलमधील साहित्य जळून सुमारे एकूण ८३ लाख ८० हजार रुपयांच्यावर नुकसान झाले आहे. शुक्रवारी पहाटे रस्त्यावरून जात असणार्या काहींना आरबी बेकरीला आग लागल्याचे निदर्शनास आले.

त्यांनी तत्काळ याबाबतची माहिती घरमालक राजू व गौरव गवाणकर यांना दिली. त्यानंतर राजू गवाणकर यांनी नगरपंचायतीला याबाबतची माहिती दिल्यानंतर तत्काळ अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. एका अग्निशमन बंबाने आग आटोक्यात येत नसल्याने कुडाळ नगरपंचायत व एमआयडीसीतील तसेच मालवण नगरपालिकेच्या अग्निशमन बंबांना पाचारण करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच कणकवली पोलीस, नगरपंचायतचे कर्मचारी, महावितरण कर्मचारी, कणकवलीचे माजी नगराध्यक्ष समीर नलावडे, सामाजिक कार्यकर्ते संजय मालंडकर, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष अबिद नाईक यांच्यासह शहरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. तब्बल तीन ते चार तासांनंतर ही आग आटोक्यात आणण्यात आली. तोपर्यंत बेकरी तसेच शेजारील बर्डे मेडिकल व राजू गवाणकर यांच्या ऑफिसमधील सर्व साहित्य जळून खाक झाले होते. तसेच इतर दुकानांनाही या आगीचा फटका बसला.

# मुरूड डोंगरी गावच्या चढणीवर झाडी वाढल्याने अपघाताची शक्यता

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरी गावच्या चढणीवर व खोराबंदरजवळील रस्त्यावरील झाडी वाढल्याने या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

मुरूड-राजपुरी हद्दीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शेकडो पर्यटक आपली वाहने घेऊन याठिकाणी ये-जा करित असतात, परंतु वळणावर वाढलेली झाडे पर्यटकांना डोकेदुखी ठरत आहे. डोंगरी गावातून खाली उतरताना खालून येणारे वाहन दिसत नाही. त्यामुळे मोठा अपघात याठिकाणी होऊ शकतो, तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्तावरील वाढलेली झाडे तत्काळ तोडून रस्ता मोकळा करून द्यावा, जेणेकरून येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास सुखाचा होईल.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरवर्षी आपल्या विभागात पावसानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूची वाढलेली झाडी तोंडून रस्ता मोकळा केला जातो, परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने या वेळी दुर्लक्ष केल्याचा दिसून येत आहे. यामुळे गारंबी, नागशेत, धनगरवाडी, वाघरपट्टी, सुपेगाव, गोपाळवट याठिकाणी रस्त्यावरील झाडे वाढलेली दिसत आहे. या संदर्भात मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी रमेश गोरे यांच्याशी संपर्क केला असता, परंतु संपर्क होऊ शकला नाही.



**दुखवटा**

**मनिषा घरत**



**उरण** : माजी तहसीलदार मनिषा मनोहर घरत (७५) यांचे गुरुवारी (दि.७) निधन झाले. अतिशय प्रेमळ आणि प्रत्येकाला कामात मदत करणाऱ्या मनिषा घरत गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होत्या. एक प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. त्या पत्रकार आशिष घरत यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

निवडक

## पार्क केलेली दुचाकी चोरली

**पनवेल :** एनएमएमटी बसस्टॉपलगत पार्क केलेल्या मोटरसायकलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. नागाणा पुजारी हे नवनाथ नगर झोपडपट्टी पनवेल येथे राहत असून ते भावाचे मोटरसायकल घेऊन पळस्पे फाटा येथे गेले होते. त्यांनी घरी आल्यानंतर एनएमएमटी बस स्टँडलगतच्या रस्त्यावर मोटरसायकल पार्क करून घरी जेवण करण्यास गेले. त्यानंतर थोड्या वेळाने ते गाडी जवळ आले असता त्यांना मोटरसायकल दिसून आली नाही.

## बाळू म्हात्रे यांची नियुक्ती



**पनवेल** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाच्या उलवे शहरप्रमुखपदी बाळू म्हात्रे यांची नियुक्ती पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. महाविकास आघाडीचे उरण मतदार संघाचे उमेदवार मनोहर भोईर यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, दिपीका भंडारकर यांच्यासह इतर पदाधिकार्यांच्या उपस्थितीत उलवे शहरप्रमुखपदी तरुण तडफदार व सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे बाळू म्हात्रे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली तसेच नियुक्तीपत्र त्यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

## कामोठ्यातून प्रचाराला सुरुवात

**पनवेल :** महाविकास आघाडीच्या उमेदवार लीना अर्जुन



गरड यांच्या प्रचाराची सुरुवात कामोठे शहर शाखा गगनगिरी महाराज यांच्या मंदिरात शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आली. या वेळी जिल्हा समन्वयक व निरीक्षक अनिल चव्हाण, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा संपर्क प्रमुख वैभव सावंत, महानगर समन्वयक दिपक घरत, तालुका प्रमुख संदीप तांडेल, शहर प्रमुख रामदास गोवारी, युवासेना सहसचिव अवचित राउत, जिल्हाधिकारी पराग मोहिते, महेश भिसे आदी उपस्थित होते.

# गव्हाण रेल्वेस्थानकाचे काम प्रगतिपथावर

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण ते नेरूळ लोकल सेवा सुरू होऊन दहा महिने उलटून गेले असले तरी अद्याप या मार्गावरील गव्हाण रेल्वेस्थानकाचे काम प्रगतिपथावर आहे.

सध्या या स्थानकाच्या फलाटावरील फरशी पॉलिशचे काम सुरू आहे. तर दुसरीकडे तिकीट घर, वाहनतळ, स्वच्छतागृह आदींची कामे सुरू आहेत. त्यामुळे कामे कधी पूर्ण होणार आणि या स्थानकावर लोकल कधी थांबणार याची प्रवाशांना प्रतीक्षा आहे.

उरण ते नेरूळ/बेलापूर या लोकल मार्गावरील पाचवे स्थानक गव्हाण आहे. या स्थानकाचे काम उशिराने सुरू झाले आहे. हे स्थानक भविष्यात महत्त्वाचे आणि वर्दळीचे ठरणार आहे, कारण



या परिसरात दहापेक्षा अधिक गावांचा परिसर आहे. जासई हे मुख्य ठिकाण आहे. सुरुवातीला गव्हाण स्थानकासाठी भूसंपादन होत नसल्याने अनेक वर्षे हा संपूर्ण मार्गच रखडला होता. त्यानंतर येथील शेतकऱ्यांना संपादित जमिनीच्या मोबदल्यात द्यावयाचे भूखंड न मिळाल्याने काम रखडले होते. अशा अनेक संकटांमुळे या स्थानकाचे काम रखडले होते.

गव्हाण स्थानकाच्या रखडलेल्या कामामुळे येथील प्रवाशांना खारकोपर स्थानकात जावे लागत आहे. गव्हाण रेल्वेस्थानक कधी सुरू होणार हे निश्चित नाही. खारकोपर ते नेरूळ/बेलापूर मार्गावरील तरघर हे स्थानक सुरू होण्यास उशीर झाला होता. या संदर्भात मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता स्थानकाच्या कामाची माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## केळवणे येथे आमदार महेश बालदी यांच्या प्रचाराचा शुभारंभ



**उरण : रामप्रहर वृत्त**

भाजप केळवणे येथे उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या प्रचाराचा शुभारंभ श्री छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार घालून आई गावदेवी चरणी नतमस्तक होऊन करण्यात आला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर घरत, भाजपचे केळवणे पं.स. अध्यक्ष सुशील ठाकूर, केळवणे शाखा प्रमुख रामचंद्र मोकळ, ग्रामपंचायत सदस्य ओंकार पाटील, मुक्ता माळी, आरती कोळी, निलमताई कोळी, माजी सरपंच जगन्नाथ म्हात्रे, माजी उपसरपंच भानुदास गावंड, राजेंद्र ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते जनार्दन थली, रवींद्र माळी, महादेव म्हात्रे, रमेश ठाकूर, प्रमोद ठाकूर, गजानन पाटील, सतीश घरत, अनंता गावंड, निलेश पाटील धर्मेंद्र भोईर विलास ठाकूर, नारायण म्हात्रे, हरी ठाकूर, राजेश घरत, संजय मारुती पाटील, जितेंद्र घरत, भारत ठाकूर, दत्तात्रेय शिवकर, सागर ठाकूर, नंदकुमार गावंड, देविदास कोळी, रोहिदास घरत, उत्तम पाटील, भगवान म्हात्रे, हरिशचंद्र पाटील, जयवंत गावंड, सुरेश महाराज शिवकर, हिरामण पाटील, निलेश म्हात्रे नारायण पाटील, विजय पाटील, दर्शन मोकळ, सचिन कोळी, किरण कोळी, विनायक कोळी, अरुण कोळी, देविदास कोळी, युवा कार्यकर्ते सचिन ठाकूर जितू गावंड, समीर ठाकूर, तेजस माळी, संतोष शिवकर, आरकेश म्हात्रे, कुमार मोकळ, प्रमोद पाटील, सत्यम ठाकूर पिंट्या ठाकूर, कृष्णा म्हात्रे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.









**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शंकर वायदंडे संपादित रायगड सम्राट हृदयस्पर्शी दिवाळी अंक, सुनील वारघडा संपादित आपले रायगड आणि अण्णासाहेब आहेर संपादित आदर्श भारत माझा या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले. या प्रकाशन सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, निलेश सोनवणे, आप्पासाहेब मगर, गणपत वारगडा, भालचंद्र जमलेदार, सुनील वारगडा, अण्णासाहेब आहेर, शेखर भोपी, राजेंद्र कांबळे, राम बोरले, साहिल रेळेकर, प्रदीप वायदंडे आदी उपस्थित होते.**

## विंधणे आठ गाव भाजप अध्यक्षपदी संजय घरत

**उरण : वार्ताहर**

विंधणे ग्रामपंचायतीमधील येणारी आठ गावाची जबाबदारी संजय नारायण घरत यांच्यावर दिली आहे. त्यांची विंधणे आठ गाव अध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आली आहे.

या वेळी प्रसाद (गंपूशेठ), पाटील, अजित पाटील (वेश्वी), रघुनाथ पाटील (कंठवली), अशोक पाटील (कंठवली), दीपक ठाकूर (खालचा पाडा), शैलेश गावंड (ग्रामपंचायत सदस्य),मनोहर जोशी (टाकी गाव), प्रकाश घरत, आकाश घरत, ओमकार घरत, तुषार घरत, सागर घरत, राम घरत आदी उपस्थित होते.

संजय घरत यांची भाजप आठ गाव अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल त्यांच्यावर विविध स्थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; तरुणाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पेठगाव परिसरात राहणाऱ्या २२ वर्षीय तरुणाने त्याच परिसरातील १६ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत मैत्री करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तरुणाला पनवेल शहर पोलिसांनी बलात्कार आणि पोक्सो कलमाखाली अटक केली आहे.

न्यायालयाने या तरुणाची १० नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. या प्रकरणातील अटक आरोपी पनवेल मधील पेठगाव परिसरात राहण्यास असून तो डिलीव्हरी बॉयचे काम करतो. तर १६ वर्षीय पिडीत मुलगीदेखील त्याच परिसरात राहण्यास असून सध्या ती शिक्षण घेत आहे. काही महिन्यापूर्वी आरोपी याने पिडीत मुलीसोबत ओळख वाढवून मैत्री केली होती. त्यानंतर त्याने ऑक्टोबर महिन्यामध्ये मुलीला मैत्रिणीशी भेट घालुन देण्याच्या बहाण्याने बोलावून घेतले होते. त्यानंतर याने मित्राच्या घरामध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. त्यावेळी याने पिडीत मुलीने आरडा-ओरड केल्यास अथवा प्रकाराबाबत कुणाला काही सांगितल्यास तिच्या भावाला आणि आईला मारण्याची धमकी दिली होती.

गेल्या आठवड्यात पिडीत मुलीने या प्रकाराची माहिती आपल्या आईला याबाबत माहिती दिली. त्यानंतर तिच्या आईने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी याच्या विरोधात बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## शिरढोणमध्ये आमदार महेश बालदींचा प्रचार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांनी बुधवारी (दि.६) शिरढोण येथे प्रचार केला.

रॉयल ओझोन को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी, साई प्रोव्हीसो काउंटी हाउसिंग सोसायटी आणि ग्रीन मेडोस सोसायटी शिरढोण येथे महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी आपला प्रचार केला. दरम्यान, मतदारांनी चांगला प्रतिसाद दिला. या वेळी मंगेश वाकडीकर, भाजप कामगार आघाडीच्या समीरा चव्हाण, कमल कुमार सिंग, अंकुर दुबे, मनीष लिंगायत, निलेश भोपी, अर्जुन शेडगे, अभिलेष ठाकूर, प्रकाश मेहता, गणेश शेलार, मुकेश धावरे, विवेक कुमार झा, विनय पाटील, कुंदा मेंगडे,नंदा मोरे, भारती शिंदे, अजय विश्वकर्मा, विशाल नाखवा आदी उपस्थित होते.





## पनवेलमध्ये दीपोत्सवी मैफल रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल असोसिएशन, सूर निरागस हो.. आणि ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकालीन दीपोत्सवी मैफलचे आयोजन केले होते. यात कोकण गंधर्व राजाभाऊ शेंबेकर, अभिषेक काळे आणि निकेता कानिटकर-लेले या त्रयींनी पनवेलकरांची दीपोत्सवी संध्या संस्मरणीय केली.

रांगोळ्या आणि पणत्यांनी सजलेल्या आणि रसिकांनी खच्चून भरलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात उत्सवी आणि प्रसन्न वातावरणात या नाट्यभक्तिधारेत पनवेलकर अक्षरशः न्हाऊन निघाले. राजाभाऊ शेंबेकरांनी राग 'भटियार'मधील 'हरिहरा ओंकार मनोहर..' या नाट्यपदाने मैफलीची सुरूवात केली. त्यानंतर सांगलीच्या अभिषेक काळे यांनी 'अहिर भैरव'मधील 'जय शंकरा.. या 'मंदारमाला' नाटकातील पदाने जणू पहाटेची वातावरण निर्मिती केली, तर पुण्याच्या निकेता कानिटकर-लेले यांनी 'अमृताहुनी गोड नाम तुझे देवा..' या अभंगाने रसिकांची मने जिंकली. त्यानंतर राजाभाऊंनी विविध रागछटा लीलया दाखवत 'आज गायन शारदेस..' हे नाट्यगीत सादर करून रसिकांना खूष केले.

कोणत्याही प्रकारचे औपचारिक संगीत शिक्षण न घेता केवळ उत्तम गवयांचे गायन ऐकून त्यावर डोळसपणे चिंतन, मनन करून आपले गाणे कसे प्रगल्भ व आशयघन करता येते याचाच हा वस्तुपाठच होता. राजाभाऊंनी पैल मेरूचे शिखरी.., दिवे लागले.., शिव के मन शरण.. ही गीतेही अत्यंत तयारीने सादर केली.

अभिषेक काळे यांनी जोहार मायबाप.., सुरत पिया की.., 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा.. या गीतांनी मैफलीला अधिक ऊंचीवर नेले. अतिशय गोड गळ्याच्या निकेता कानिटकर-लेले यांनी 'मधुकर वन वन फिरत.., 'नरवर कृष्णा समान.., 'बोला अमृत बोला.. ही पदे गाऊन रसिकांची वाहवा मिळवली. या मैफलीचे अतिशय रंजक पण अभ्यासपूर्ण निवेदन केले निबंध कानिटकर यांनी. या मैफलीला हेरंब जोगळेकर (तबला), हर्षल काटदरे (ऑर्गन), सूरज गोंधळी (पखवाज), समीर कर्वे (टाळ) यांची साथसंगतही सुयोग्य अशी होती.




## एलजेपीचा शपथनामा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत लोकमुद्रा जनहित पार्टी (एलजेपी) चे उमेदवार कांतीलाल कडू यांच्या पक्षाचा शपथनामा प्रसिद्ध करण्यात आला.

लोकमुद्रा जनहित पार्टीचे पक्षाध्यक्ष व उमेदवार कांतीलाल कडू हे यंदाची निवडणूक नव्या राजकीय पक्षाच्या माध्यमातून निवडणूक लढवित असून त्यांची निशाणी सतार (वीणा) ही आहे. या पक्षाचा शपथनामा पत्रकार परिषदेद्वारे जाहीर करण्यात आला.

या वेळी डॉ. भक्तीकुमार दवे, डॉ. अमित दवे, विजय काळे, आनंदा पाटील, सुधीर सोमवंशी, मनस्वी गोवारी, अश्विनी भोसले, प्रसाद जाधव, डॉ. मुनीर तांबोळी आदी उपस्थित होते.



## स्वीप कार्यक्रमांतर्गत ज्येष्ठांसाठी मतदान जनजागृती कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४च्या पार्श्वभूमीवर पनवेल मतदारसंघ १८८मध्ये मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता स्वीप कार्यक्रमांतर्गत जनजागृती करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार नुकताच जेष्ठ नागरिकांसाठी मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या बैठक गृहामध्ये स्वीप प्रमुख शहर अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी सहायक आयुक्त डॉ. रूपाली माने, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, अभियंता गजानन देशमुख, अभियंता प्रसाद परब, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर, सचिव सुनील खेडेकर, उपाध्यक्ष माधुरी गोसावी तसेच जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येत्या २० नोव्हेंबर रोजी पनवेल विधानसभेची निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची(सिस्टेमॅटिक वोटर्स






एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम )अमंलबजावणी १८८ पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत जेष्ठ नागरिकांना मतदानाचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच उपस्थित सर्वांना मतदान शपथ देण्यात आली.

स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी पनवेल महानगरपालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये प्रभातफेरी, बाईक रॅली, सायकल रॅली काढणे, वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्ये स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, बचत गटातील महिलांची बैठक व रॅली असे विविध कार्यक्रम राबविले जात आहे.

## संपादकीय

# फुटिरतावादाला खतपाणी

जम्मू आणि काश्मीरला पूर्वीप्रमाणे विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या ठरावावरून तेथील विधानसभेत बुधवारी जोरदार खडाजंगी झाली आणि त्याच गदारोळात पूर्वीप्रमाणे जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याचा ठराव चर्चेविना मंजूरही करण्यात आला. भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस सरकारच्या 'कलम३७०' पुन्हा बहाल करण्याच्या या प्रस्तावाला कडाडून विरोध केला. पुनर्रचित जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्यावहिल्या अधिवेशनात पुन्हा 'कलम ३७०'च्या नावाखाली फुटीरतावादी शक्तींनी डोके वर काढणे दुर्दैवी आहे.

**पाच वर्षांपूर्वी केंद्रातील मोदी सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द केले व हे राज्य जम्मू-काश्मीर तसेच लडाख या दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजित केले. त्यानंतर काश्मीरमधील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती सुधारली. राज्यातील दहशतवाद्याच्या कारवाया व हिंसाचार जवळपास संपुष्टात आला. केंद्र सरकारच्या थेट नियंत्रणामुळेच हे शक्य झाले. आणखी काही काळ हा प्रदेश केंद्राच्या नियंत्रणाखाली राहता तर सरकारी योजनांचे लाभ सर्वसामान्यांपर्यंत नीट पोहोचून फुटिरतेची भावना नष्ट करणे शक्य झाले असते, पण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या महिन्यात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. निवडणुकांच्या प्रचारादरम्यानच 'नॅशनल कॉन्फरन्स' पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात जम्मू-काश्मीरला पुन्हा विशेष राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासन दिले व त्यानुसार विधिमंडळाच्या पहिल्यावहिल्या अधिवेशनात बुधवारी उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी यांनी विशेष राज्याच्या दर्जासंबंधीचा ठराव मांडला. कामकाजाचा भाग नसताना ठराव मांडल्याने भाजप सदस्यांनी आक्षेप घेत त्याचा तीव्र विरोधही केला. या वेळी प्रचंड गदारोळात हा ठराव मंजूर करण्यात आला. मंजुरीनंतर सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सने आपण जाहिरनाम्यात दिलेले वचन पूर्ण केल्याचा दावा केला तर पीपल्स डेमॉक्रेटिक पार्टीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी, ठरावात राज्याला विशेष दर्जा बहाल करण्यासाठी केंद्राला चर्चेचे आवाहन कशासाठी असा सवाल केला. वास्तवत: कलम ३७० इतिहासजमा झाले असून नॅशनल कॉन्फरन्सने या ठरावाद्वारे यासंदर्भातील वाद पुन्हा जागा केला आहे. पाच वर्षांपूर्वी, ५ ऑगस्ट २०१९ रोजी हे कलम रद्द केले गेले. कलम ३७० रद्द करण्याचा प्रस्ताव संसदेत गृहमंत्री अमित शहा यांनी मांडला व त्या प्रस्तावावर त्यावेळी व्यापक चर्चाही झाली होती. कलम ३७० व ३५अ या दोन कलमांमुळेच काश्मीरमध्ये फुटीरतावाद वाढला याचे उत्तम विश्लेषण त्यावेळी अमित शाह यांनी केले होते. या दोन कलमांमुळे केंद्र सरकारच्या अनेक योजना व सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निकाल जम्मू-काश्मीरमध्ये लागू करता येत नव्हते. देशाच्या अन्य भागांतील नागरिकांना या राज्यात स्थावर मालमत्ता विकत घेण्यास कायद्याद्वारे मनाई करण्यात आली होती. भारत सरकारचे कायदेही तेथे काश्मिरी विधानसभेच्या परवानगीनेच लागू होत. अशातऱ्हेने जणु काही काश्मीर म्हणजे देशांतर्गत एक स्वतंत्र देशच बनले होते. यातूनच फुटीरतावादाची भावना निर्माण होऊन पाकिस्तानने पुढे त्याचे इस्लामी कट्टरतेत रूपांतर केले. सुमारे चार दशकांच्या हिंसाचारात तेथे हजारो लोकांचे जीव गेले. हिंदू काश्मिरी पंडितांच्या हालांना पारावार उरला नाही. वास्तवात या वणव्यात काश्मीरची अर्थव्यवस्थाही धुळीला मिळाली. काश्मीर उद्ध्वस्त होण्यास जबाबदार असलेले हे कलम रद्द करून केंद्र सरकारने काश्मीरला सावरण्याची एक संधी दिली, पण गेल्या महिन्यात निवडणुका पार पडल्यानंतर बुधवारी तेथील विधानसभेत विशेष दर्जावरून जे घडले ते दुर्दैवी म्हणावे लागेल.**

# आचारसंहितेदरम्यान काय करावे आणि काय करू नये

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच 'आचारसंहिता' म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी काय करावे आणि काय करू नये याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत.

**आचारसंहिता काळात काय करावे?**

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.

प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

**आचारसंहिता काळात काय करू नये?**

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष/शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम/निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खासगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे.

इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील ॲपवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

**-मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे तथा नोडल अधिकारी, एकत्रित मीडिया कक्ष आणि सदस्य सचिव, माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, ठाणे**

# प्रसिद्ध विनोदी लेखक, नाटककार पु.ल. देशपांडे



महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेले पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल. देशपांडे एक लोकप्रिय मराठी विनोदी लेखक तसेच शिक्षक, अभिनेते, पटकथालेखक, संगीतकार, नाटककार, कवी, गायक आणि वक्ते ही होते.

पु.ल.देशपांडे यांचा जन्म मुंबईतील गावदेवी या भागात गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबामध्ये ८ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला. त्यांचे आजोबा वामन मंगेश दुभाषी हे एक कवी व साहित्याचे जाणकार होते. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले तसेच त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले. त्यांनी मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एल्एल.बी. ची पदवी घेतली आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी केली. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए.आणि नंतर एम.ए. केले.

फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये असताना देशपांडे यांनी नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. १९३७ पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले होते. १९४० च्या दशकात त्यांनी साहित्यक्षेत्रात पदार्पण केले. १९४६ साली त्यांचे सुनीताबाईंशी विवाह झाले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. देशपांडे यांनी संगीत दिले आणि चित्रपटातील गाणी देखील गायले.

खरं तर आजोबांनी लिहून दिलेले आणि पु.ल. यांनी पाठ केलेले पहिले भाषण त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी शाळेत हावभावासहित खणखणीत आवाजात म्हणून दाखवल्याचे सांगितले जाते. सात वर्षे अशी भाषणे केल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षापासून देशपांडे स्वतः ची भाषणे स्वतःच लिहायला लागले. तर ते इतरांनाही भाषणे आणि संवाद लिहून देऊ लागले.

पुलंना घरात खूप वाचन करायला मिळाले तर रेडिओवरील संगीत ऐकायला देखील मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत अशात ते घरीच बाजाची पेटी शिकले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते संगीत व अन्य शिकवण्या करू लागले. १९५५मध्ये पु.ल.देशपांडे आकाशवाणीत नोकरीला लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. नंतर ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. बदलीवर दिल्लीला गेले. १९५८ मध्ये पुलंना आकाशवाणीने युनेस्कोच्या शिष्यवृत्तीवर मीडिया ऑफ मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी लंडनला बीबीसीकडे पाठवले. १९५९ मध्ये देशपांडे भारतातील पहिले दूरचित्रवाणी कार्यक्रम निर्माते झाले.


**पुरस्कार आणि सन्मान**

साहित्य अकादमी पुरस्कार- १९६५, पद्मश्री- १९६६, संगीत नाटक अकादमी पुरस्कार- १९६७, कालीदास सन्मान- १९८७, पद्मभूषण- १९९०, पुण्यभूषण- १९९२, महाराष्ट्र भूषण पुरस्कार- १९९६, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ(१९९३) कडून मानाची डी. लिट. पदवी, महाराष्ट्र गौरव (बहुरूपी) पुरस्कार

**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप युजर्स शोधणार फोटो खरा की खोटा?




व्हॉट्सॲप आपल्या युजर्ससाठी एक नवीन फीचर आणणार आहे, ज्याद्वारे युजर्स फोटो खरा आहे की खोटा हे जाणून घेऊ शकणार आहेत. या फीचरच्या मदतीने तुम्ही कोणताही फोटो इंटरनेटवर कुठे उपलब्ध आहे की नाही हे तपासू शकता. सध्या हे फीचर काही निवडक युजर्सना दिलं जात आहे, परंतु ते लवकरच सर्व युजर्ससाठी येऊ शकतं. आजकाल लोक फोटो बदलून खोट्या बातम्या पसरवत आहेत. ही समस्या सोडवण्यासाठी व्हॉट्सॲप हे एक नवीन फीचर आणत आहे.

नव्या फीचरमुळे युजर्सना फोटोबाबत योग्य माहिती मिळेल. हे फीचर वापरण्यासाठी, तुम्हाला जो फोटो चेक करायचा आहे त्यावर क्लिक करावं लागेल. त्यानंतर, तुम्हाला तीन डॉटवर क्लिक करावं लागेल आणि वेब सर्च हा पर्याय निवडावा लागेल. यानंतर, व्हॉट्सॲप इंटरनेटवर तो फोटो शोधेल आणि हा फोटो आधी कुठे दिसला आहे त्याबाबत माहिती देईल. यावरून तुम्हाला हा फोटो खरा आहे की खोटा हे कळेल.

व्हॉट्सॲपच्या या फीचरच्या मदतीने कोणीही सहज फोटो चेक करू शकतो. या फीचरचा कसा वापर करायचा हे तुमच्यावर आहे. जेव्हा तुम्ही एखादी इमेज सर्च करता तेव्हा ती इमेज गुगलला पाठवली जाते, पण व्हॉट्सॲप ती इमेज सेव्ह करत नाही. तुम्हाला योग्य माहिती मिळावी म्हणून व्हॉट्सॲप फक्त गुगलची मदत घेतं. यामुळे तुम्हाला फोटोबाबतची सत्यता सहज समजू शकते.

आत्तापर्यंत, व्हॉट्सॲपचं हे जबरदस्त फीचर फक्त काही खास लोकांना देण्यात आलं आहे, ज्यांनी Google Play Store वरून व्हॉट्सॲप चं बीटा व्हर्जन डाउनलोड केलं आहे. पण लवकरच व्हॉट्सॲप हे फीचर सर्व युजर्ससाठी उपलब्ध करून देणार आहे. या फीचरमुळे युजर्स व्हॉट्सॲप वरच झटपट फोटोंची सत्यता तपासू शकतील.

# भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी



## निमित्त

लालकृष्ण अडवाणी यांचा आज जन्मदिवस. लालकृष्ण अडवाणींचा जन्म ८ नोव्हेंबर १९२७ रोजी आता पाकिस्तानमध्ये असलेल्या कराची येथे झाला. लालकृष्ण अडवाणी भारतीय जनता पार्टीचे संस्थापक सदस्य आणि २००२ ते २००४पर्यंत भारताचे उपपंतप्रधान होते. त्यांच्या ९४व्या वाढदिवसानिमित्त आपण आज त्यांच्या राजकीय प्रवासाबद्दल अधिक जाणून घेऊया.

लालकृष्ण अडवाणी हे भारताच्या राजकारणातले महत्वाचे राजकारणी आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. ते भारतीय जनता पक्षाच्या सहसंस्थापकांपैकी एक आहेत. ते उजव्या विचारसरणीच्या हिंदू राष्ट्रवादी संघटनेचे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दीर्घकाळ सदस्य आहेत. २०१५मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण देऊनही सन्मानित करण्यात आले होते.

लालकृष्ण अडवाणी यांचा जन्म किशनचंद डी. अडवाणी आणि ग्यानी देवी यांच्या पोटी कराचीमध्ये ८ नोव्हेंबर १९२७ रोजी सिंधी हिंदू उद्योगपती कुटुंबात झाला. त्यांनी आपले प्रारंभिक शिक्षण सेंट पॅट्रिक्स हायस्कूल, कराची, सिंध येथून घेतले आणि नंतर सरकारी महाविद्यालय हैदराबाद, सिंधमध्ये प्रवेश घेतला. लालकृष्ण अडवाणी वयाच्या १४व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले आणि कराची शाखेचे प्रचारक (पूर्णवेळ कार्यकर्ता) बनले आणि तेथे विविध शाखा देखील विकसित केल्या. फाळणीनंतर ते आपल्या कुटुंबासह भारतात स्थलांतरित झाले आणि मुंबईत स्थायिक झाले जेथे त्यांनी बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि तेथून कायद्याची पदवी घेतली. फाळणीनंतर अडवाणींना अलवर, राजस्थान येथे पाठवण्यात आले. अलवर व्यतिरिक्त त्यांनी भरतपूर, कोटा, बुंदी आणि झालावाड जिल्ह्यातही काम केले. त्यांनी के. आर. मलकानी यांना आरएसएस साप्ताहिक, ऑर्गनायझरच्या संपादनातही मदत केली.

लालकृष्ण अडवाणी भारतीय जनता संघ श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सहकार्याने स्थापन केलेल्या भारतीय जनसंघात अडवाणी सामील झाले. लालकृष्ण अडवाणी यांची राजस्थानमधील जनसंघाचे तत्कालीन सरचिटणीस एसएस भंडारी यांच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली होती. संसदीय कामकाज पाहण्यासाठी त्यांना दिल्लीत हलवण्यात आले आणि लवकरच ते सरचिटणीस आणि नंतर जनसंघाच्या दिल्ली युनिटचे अध्यक्ष बनले.

लालकृष्ण अडवाणी यांनी १९९०मध्ये गुजरातमधील सोमनाथ ते उत्तर प्रदेशातील अयोध्येपर्यंत 'रथयात्रा' सुरू केली. यात्रेचा उद्देश 'कारसेवक' किंवा स्वयंसेवकांना एकत्र करणे हा होता. २००९च्या निवडणुकीसाठी, लालकृष्ण अडवाणी यांना भारतीय जनता पक्षाने पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नियुक्त केले होते. कारण ते वाजपेयींनंतर भाजपचे सर्वांत शक्तिशाली नेते होते. २०१०मध्ये त्यांची एनडीएचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

२०१४मध्ये लालकृष्ण अडवाणी मुरली मनोहर जोशी आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या मार्गदर्शक मंडळात सामील झाले. आता त्यांनी पक्षाच्या सर्व राजकीय घडामोडीपासून अलिप्तता घेतली असली तरी भारतीय जनता पक्षाची रुजवात करणारे नेते म्हणून आजही त्यांच्याकडे मोठ्या आदराने पहिले जाते.

**(साभार : ज्ञानशाळा)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : गाढी नदीशेजारी असलेल्या कल्पतरू सोसायटी येथील उद्यानात आता ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले आहे.**

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या... लहान मुलांना वारंवार ताप का येतो?

लहान मुलांना ताप आला की पालक घाबरतात. अर्थातच लहान मुलं असल्याने काळजी वाटणे स्वाभाविक आहे. पण, तुम्हाला माहिती आहे का, की ताप येणे चांगली गोष्ट आहे. कारण, ताप आल्याने कळते की, आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय आहे. पण, याचवेळी ताप हा एक आठवडा किंवा त्याहून अधिक काळ कायम राहिला तर ते गंभीर आजाराचे लक्षण असू शकते.



ताप म्हणजे काय? बाहेरचे तापमान कितीही बदलले तरी आपल्या शरीराचे तापमान ३७ अंश सेल्सिअस म्हणजेच ९८.३ फॅरेनहाइट राहते. दिवसातील आपल्या कृतीनुसार ते एक अंशाने कमी किंवा वाढू शकते जे सामान्य आहे, परंतु जर तापमान ३८ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढले तर शरीरात अशक्तपणा, डोळ्यांमध्ये जळजळ आणि कधीकधी उलट्या सुरू होतात, ज्याला ताप म्हणतात.

तापाला शास्त्रीय भाषेत काय म्हणतात? तापाला वैद्यकीय भाषेत पायरेक्सिया म्हणतात, ताप ही शरीराची प्रतिक्रिया आहे हे आपल्या सर्वांना माहित आहे. जे आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय करून बॅक्टेरिया, विषाणूंशी लढण्यास मदत करते. तापाचे शास्त्र काय आहे आणि तो आला नाही किंवा सतत आला तर काय होईल हे समजून घेऊया.

ताप नसल्यास काय होते? ताप शरीरासाठी खूप महत्वाचा असतो, कारण तो सांगतो की आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय आहे, जरी ताप जास्त नसावा. जर ताप एक आठवडा किंवा त्याहून अधिक काळ कायम राहिला तर ते गंभीर आजाराचे लक्षण असू शकते, अशा वेळी त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.

शरीराचे तापमान किती असावे? सर्वसाधारणपणे ताप जास्त असल्यास ताबडतोब डॉक्टरांकडे जावे. विज्ञानाचाही यावर विश्वास आहे, कारण अंतर्गत तापमान ४४ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असेल तर रुग्णाचा मृत्यूही होऊ शकतो.

शरीराचे तापमान का वाढते?

हायपोथालेमस दोन प्रकारे शरीराचे तापमान वाढवते, एकतर थरथरणे किंवा अशक्तपणासह. असे करून आपला मेंदू विषाणूशी लढण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून शरीरात गेलेल्या रोगकारक परजीवींचे वर्चस्व राहणार नाही. सामान्य भाषेत याला रोगप्रतिकारक शक्ती म्हणतात. त्याची प्रतिक्रियाच ताप आणते.

# श्रीवर्धन मतदारसंघात दोन राष्ट्रवादीमध्ये लढत

## ना. आदिती तटकरे विरूद्ध अनिल नवगणे प्रमुख सामना

**रोहे : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात उमेदवारांबाबत आश्चर्यकारक घटना घडत असताना उमेदवारांचे चित्र स्पष्ट झाल असून चुरस वाढली आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेससाठी सोपा जाणार असल्याचे बोलले जात आहे, मात्र राष्ट्रवादीच्या उमेदवार ना. आदिती तटकरे यांची थेट लढत ही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अनिल नवगणे यांच्याशी होणार आहे. निवडणूक जसजशी जवळ येऊ लागले तसतसे निवडणुकीच्या वातावरणातील रंग पाहता ही निवडणूक चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे.



खासदार सुनील तटकरे यांचे वर्चस्व असलेल्या श्रीवर्धन मतदारसंघात त्यांची पकड घट्ट असल्याचे बोलले जात आहे, परंतु राजकीय धुरंदर म्हणून ओळख असलेल्या खासदार शरद पवार यांनी या मतदारसंघात कुणबी समाजाचा उमेदवार म्हणून अनिल नवगणे यांना पुढे आणल्यानंतर राजकीय रणधुमाळीत रंग भरू लागले आहेत. श्रीवर्धन मतदारसंघात कुणबी समाज, मुस्लिम समाजाची मते मोठ्या प्रमाणात आहेत.



या विधानसभा मतदारसंघात निर्णायक मते म्हणून कुणबी समाजाकडे पाहिले जाते. या वेळी अनिल नवगणे यांच्या रूपाने कुणबी समाजाचे उमेदवार निवडणूक लढवत आहे. त्यांना त्याचा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. या सगळयात महत्त्वाची भूमिका मुंबईकरांची असते. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात खासदार सुनील तटकरे, विद्यमान मंत्री आदिती तटकरे यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली असल्याचे सातत्याने प्रचारादरम्यान ते सांगत आहेत. या विकासकामांचा त्यांना किती फायदा होईल, हे मतपेटीतूनच दिसून येईल.

या वेळी श्रीवर्धन मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही आपला उमेदवार उभा करून नशीब आजमावत आहे. फैजल अब्दुल अजीज पोपेरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अर्ज दाखल करून चुरस निर्माण केली आहे. निवडणुकीसाठी उभे असलेल्या साऱ्याच उमेदवारांच्या गाठीभेटी सुरू झाल्या आहेत.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीकडून महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून अनिल नवगणे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून फैजल अब्दुल अजीज पोपेरे यांच्यासह या निवडणुकीत अश्विनी उत्तम साळवी (बहुजन समाज पार्टी), अनंत बाळोजी गीते (अपक्ष), अशरफ खान दादाखान पठाण (अपक्ष), कोबनाक कृष्णा पांडुरंग (अपक्ष), मोहम्मद कासीम बुरहानुद्दीन सोलकर (अपक्ष), युवराज प्रकाश भुजबळ (अपक्ष), राजाभाऊ ठाकूर (अपक्ष), संतोष तानाजी पवार (अपक्ष) असे एकूण ११ उमेदवार रिंगणात उभे आहेत.

रोहा, माणगाव, तळा, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांचा श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये समावेश आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात पुरुष एक लाख २९ हजार ९१८ मतदार तर महिला एक लाख ३५ हजार ३६८ मतदार असे एकूण दोन लाख ६५ हजार २८६ मतदार आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्रीमती. बेबीबाई मुकुंद महाबदी रा.१२, पोंद, माडप, ता. खालापूर, जि. रायगड.४१०२०२ यांचे असे निदर्शनास आले आहे की, श्री. गणेश अरूण भगत, रा.१११, उसर्ली खुर्द, पो.ओ.एन.जी. सी., ता. पनवेल, जि. रायगड.४१०२२१ यांनी खालील परिशिष्टात नमुद मिळकतींचे बाबत आमचे अशिलांनी त्यांस दि.०५/०६/२०२४ रोजीचे कुलमुखत्यारपत्र लिहून घेतले आहे. तसेच खालील परिशिष्टामधील अ.क्र.४,५,६ कडील मिळकतींचे अनुषंगाने दि.०५/०६/२०२४ रोजी साठेकरार केलेला आहे. वस्तुतः, माझे अशिलांचा श्री. गणेश अरूण भगत यांचे सोबत खालील परिशिष्टातील नमुद मिळकतींबाबत कधीही कोणताही व्यवहार झाला नव्हता व नाही. तसेच माझे अशिलांनी श्री. गणेश अरूण भगत अथवा अन्य कोणासही कोणत्याही प्रकारचे कुलमुखत्यारपत्र दिलेले नाही. खालील नमुद परिशिष्टातील मिळकतीं बाबत काही प्रतिज्ञापत्र करणेकामी आमचे अशिलांनी श्री. गणेश अरूण भगत यांस सांगितले होते, परंतु त्यांनी आमचे अशिल अशिक्षीत असल्याचा गैर फायदा घेऊन आणि आमचे अशिलांस खोटी माहिती देऊन त्यांची फसवणुक करून वर नमुद केलेले दस्त स्वतःचे लाभात निष्पादित केलेले आहेत. सदरचे दि.०५/०६/२०२४ रोजीचे साठेकरार व कुलमुखत्यारपत्र हे खोटे आणि बनावट स्वरूपाचे असून ते आमचे अशिलांवर तसेच अन्य कोणावरही बंधनकारक नाहीत.

तरी श्री. गणेश अरूण भगत यांनी खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवर मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध निर्माण केलेला असल्यास तो प्रथमदर्शनीच फोल असून रद्द समजणेत यावा. तसेच, मा. दिवाणी न्यायालय किंवा महसुली न्यायालय किंवा अन्य कोणत्याही न्यायाधिकरणापुढे आमचे अशिलांचे वतीने कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई केली असल्यास ती रद्दबातल समजण्यात यावी. तसेच त्याबाबत कोणासही काहीही माहिती असल्यास त्याबाबत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून तत्काळ आमचे अशिलांस अथवा आम्हांस कळविण्यात यावे. तसेच दि.०५/०६/२०२४ रोजीचे साठेकरार व कुलमुखत्यारपत्र हे खोटे आणि बनावट स्वरूपाचे असल्याने ते फोल आहेत. याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**परीशिष्ट**
**शेतजमीन जमिनीचे वर्णन**
**मौजे लोणिवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| अ.नं. | गट नं. / सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १ | ४१/४ | ०-६६-०० | १.५० |
| २ | ४१/१/१ | ६-०२-०० | ६.५३ |
| ३ | ४७/२ | ०-७७-९० | १०.६२ |
| ४ | ५६/३ | १-३८-०० | १६.६८ |
| ५ | ४८/१ | १-३२-७० | १५.८८ |
| ६ | ६४/२ | ०-०१-८० | ०.०६ |
| ७ | ७८/९ | ०-०१-५० | ०.०३ |
| ८ | ८१/४ | ०-४०-५० | ६.३७ |
| ९ | ८१/६/७ | ०-१७-१० | ३.४७ |
| १० | ८२/१ | ०-१३-९० | ०.८१ |

दिनांक: ०७/११/२०२४

सही/-
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**
**शॉप नं. १२५, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.८०९७३९९३३१**

## आमदार रविशेठ पाटील मताधिक्याने निवडून येणार -भाजप नेते राजेश मपारा

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या सुधागड तालुक्यातील केलेली विकासकामे तसेच सुधागडकरांचे त्यांच्यावर असलेले प्रेम पाहून रविशेठ पाटील यांचा एक लाख मताधिक्याने विजय होणार असून फक्त शिक्कामोर्तब होणे बाकी आहे, असा दावा भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश मपारा यांनी केला आहे.



पेण सुधागड विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या वतीने भाजपचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ सिद्धेश्वर, आपटणे, पाच्छापूर गोंडाळे या गावात बैठक घेण्यात आले. या वेळी दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष गीता पालरेचा, सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, आमदार रविशेठ पाटील यांनी आजपर्यंत मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. त्यांनी पेण-सुधागड मतदारसंघात कुटुंबप्रमुखाप्रमाणे जबाबदारी घेऊन कामे केली. त्यांनी प्रत्येक गावात केलेली विकासकामे त्यांची जमेची बाजू असून गावोगावी त्यांचा असलेला जनसंपर्क व महायुतीच्या ताकदीच्या जोरावर आमदार रविशेठ पाटील हे एक लाख मताधिक्याने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

## मुरूडमध्ये वाहन पार्किंगचे दर कमी करण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी विविध भागातून येणाऱ्या पर्यटकांकडून गाडी पार्किंगसाठी कर आकारला जातो. यावर राजपुरी येथील प्रवेशद्वाराजवळ ग्रामपंचायतीची कर पावती भरावी लागते. त्यानंतर बोटीचा खर्च, पुरातत्व खात्याच्या किल्ला पाहण्याचे तिकीट असा मोठा खर्च पर्यटकांना सहन करावा लागत आहे. यामध्ये वाहन पार्किंगचे पैसे मोठ्या प्रमाणात असून हे पैसे तातडीने कमी करण्यात यावे, अशी मागणी तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी केली आहे.



या वेळी सुर्वे यांनी सांगितले की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने वाहन पार्किंगचा ठेका दिला आहे. पार्किंगचे दर जर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दिले असतील तर प्रत्येक तिकिटावर बोर्डाचा शिक्का आवश्यक आहे. वाहन पार्किंगच्या तिकिटावर पर्यटकांकडून जीएसटी कर आकारला जात आहे.

जर संबंधित ठेकेदार खरोखर जीएसटी भरत असेल तर त्याने आपला जीएसटी नंबर जाहीर करावा, तसेच आतापर्यंत किती जीएसटी रक्कम शासनाकडे जमा केली याचा तपशीलसुद्धा देण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे-उलवे, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक श्री. बारक्या पदया पाटील व इतर यांचेकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**संपादित जमीन व इरादित भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| गाव / निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | निवाडाधारकाचे नाव | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| उलवे १५१ | ४९/० ३८/० | ०-६-० ०-३७-० | ४०० | श्री. बारक्या पदया पाटील | उलवे | १०B | ७७A | ८५० |
| उलवे १५१ | ४१/५ ४३/६ ४५/४ | ०-२५-० ०-१२-१ ०-१७-० | ४५० | श्री. बारक्या पदया पाटील व इतर | | | | |

शासन निर्णयानुसार साडेबारा टक्के योजनेअंतर्गत वरील तक्त्यात नमूद मौजे उलवे निवाडा क्र.१५१, सर्व्हे नं./हि.क्र.४९/० व इतर, एकूण क्षेत्र-०-४३-० हे.आर. या संपादित जमिनीपोटी ४०० चौ.मी. पात्रता मंजूर आहे. व मौजे उलवे निवाडा क्र.१५१, सर्व्हे नं./हि.क्र.४१/५ व इतर, एकूण क्षेत्र- ०-५४-१ हे.आर. या संपादित जमिनीपोटी ४५० चौ.मी. पात्रता मंजूर आहे. सदर एकूण ८५० चौ.मी. पात्रतेकरिता दि. ११.०६.२०२२ रोजी झालेल्या संगणकीय सोडतीद्वारे उलवे नोड येथील भूखंड क्र. ७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. हा भूखंड इरादित करण्यात आलेला आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारक श्रीमती मुक्ताबाई काशिनाथ कोळी यांनी दुय्यम निबंधक, पनवेल-१ यांच्याकडे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-५८२५/२०२४ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून उलवे नोड येथील भूखंड क्र. ७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. या भूखंडाचे लाभ श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारक १) श्रीमती आनंदी विनसेन नुन २) श्रीमती वंदना जयंत चव्हाण ३) श्रीमती करुणा जगन कोळी यांनी दुय्यम निबंधक, पनवेल-१ यांच्याकडे दिनांक १४/०८/२०२४ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-६२६८/२०२४ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून उलवे नोड येथील भूखंड क्र. ७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. या भूखंडाचे लाभ श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारक १) श्रीमती यमुना नारायण कोळी व २) श्रीमती लक्ष्मीबाई रमाकांत पाटील यांनी दुय्यम निबंधक, पनवेल-१ यांच्याकडे दिनांक ०१/०८/२०२४ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-५९११/२०२४ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून उलवे नोड येथील भूखंड क्र. ७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. या भूखंडाचे लाभ १) श्री. जनार्दन नारायण कोळी, २) श्री. कमलाकर नारायण कोळी, ३) श्री. सुधाकर नारायण कोळी व ४) श्री. बाळकृष्ण नारायण कोळी यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.

हक्कसोड पत्रकांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' बाबत दिनांक २९.०५.२०१४ अन्वये कार्यपध्दती निश्चित केली आहे.

सदर महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' च्या **मुद्दा क्र. ii** नुसार हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्यानुसार वर नमूद हक्कसोड पत्रामध्ये उलवे नोड येथील भूखंड क्र. ७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. या भूखंडाचा तपशील नमूद केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| श्रीमती मुक्ताबाई काशिनाथ कोळी | श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी |
| श्रीमती आनंदी विनसेन नुन<br>श्रीमती वंदना जयंत चव्हाण<br>श्रीमती करुणा जगन कोळी | श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी |
| श्रीमती यमुना नारायण कोळी<br>श्रीमती लक्ष्मीबाई रमाकांत पाटील | श्री.जनार्दन नारायण कोळी<br>श्री. कमलाकर नारायण कोळी<br>श्री. सुधाकर नारायण कोळी<br>श्री. बाळकृष्ण नारायण कोळी |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्ती उपरोक्त भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

वरील इरादित केलेल्या भूखंडासंदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३२५/२०२४-२५


## माथेरानमध्ये पर्यटकांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानला येणाऱ्या पर्यटकांकडून नगर परिषद स्वच्छता व प्रवासी कर आकारते, मात्र येथे पर्यटकांना प्राथमिक सुविधा कमी पडत होती. याकरिता माथेरान निसर्ग पर्यटन स्टॉल या संघटनेने पाठपुरावा करीत पर्यटकांसाठी स्वच्छतागृहांची दुरूस्ती करून घेतली आहे.

माथेरान वनव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची व्यवस्था केलेली आहे, पण अनेक ठिकाणी पाणीपुरवठ्याची जोडणी नाही, तर काही ठिकाणी नळाची जोडणी तुटलेली आहे. त्यामुळे माथेरान निसर्ग पर्यटन स्टॉल संघटनेचे अध्यक्ष संतोष कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जोरदार आवाज उठविला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

## भातकापणी झाली, भारे मात्र शेतात!

### मजुरांअभावी शेतकऱ्यांची गैरसोय

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळी संपली आणि शेतमजूर परतीच्या प्रवासाला लागले, मात्र अजूनही शेतकऱ्यांची भातकापणी मजुरांअभावी खोळंबलेली आहे. त्यातच निवडणुकीच्या रणधुमाळीत शेतमजूर मिळणे झाले अवघड झाले आहे. नोव्हेंबर महिन्यात ऑक्टोबर हिट जाणवत असल्यामुळे शेतमजूर भातकापणीस उदासिनता दर्शवित आहे. काही ठिकाणी भातकापणी झाली असून शेतामध्ये भारे तसेच पडलेले असल्याचे पहावयास मिळत आहे.




शेतीच्या कामात मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे शेतमजुरांशिवाय शेतीची कामे होणे अशक्य असते, मात्र जे अल्प भूधारक आहेत ते घरातील सदस्यांना सोबत घेऊन शेतातील कामे करून घेत आहेत. रणरणत्या उन्हात भाताच्या लोंब्यांतून दाणा अलग होत असते. शिवाय पहाटे पडत असलेल्या धुक्यामुळे पेंढा खराब होत असल्यामुळे गुरांसाठी चारा कुठून आणायचा? असा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे.


ज्यांच्याकडे पशुधन नाही ते भातझोडणीनंतर पेंढ्यांची विक्री करतात, मात्र थंडीमुळे पेंढा कुजत आहे. शिवाय परतीच्या पावसामुळे धान्याला अंकुर फुटल्याचे समोर आले आहे.


## खोपोली-खालापुरात तिन्ही उमेदवारांचा चुरसपूर्ण प्रचार

**खोपोली : प्रतिनिधी**

अष्टविनायक क्षेत्र महड येथे वरदविनायकाचे दर्शन घेऊन कर्जत-खालापूर मतदारसंघातील तिन्ही प्रमुख उमेदवारांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. प्रचाराच्या पहिल्या आठवड्यात प्रतिस्पर्धी तिन्ही उमेदवारांचा भर खोपोली नगरपालिका क्षेत्र व खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील मतदारांपर्यंत पोहचवून त्या त्या सामाजिक कार्यकर्ते, संस्था व सर्वसामान्य मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यावर आहे.







महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी मंगळवार व बुधवारी संपूर्ण खोपोली शहरात जोरदार प्रचार केला, तसेच अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांनी खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागात गावभेटीवर भर देत प्रचार मोहीम राबवली.

महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांनी खोपोलीसह खालापूर तालुक्यातील विविध गावांत भेटीगाठी घेत प्रचाराची आखणी केली आहे. तिन्ही प्रमुख उमेदवारांत विजयासाठी जोरदार व अत्यंत चुरशीची लढत होणार आहे.

महेंद्र थोरवे यांच्याकडून मागील अडीच तीन वर्षातील पूर्णत्वास आलेली भक्कम विकासकामे व भविष्यात होणारी विकासकामे यावर अधिक भर दिला जात आहे. दुसरीकडे प्रतिस्पर्धी उमेदवार सुधाकर घारे व नितीन सावंत यांच्याकडून महेंद्र थोरवे यांच्याविरोधात प्रचार राबविण्यात येत आहे.

तिन्ही प्रमुख उमेदवारांना मतदार, कार्यकर्त्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत असल्याने, उमेदवार व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांत मोठा उत्साह संचारला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथील रेव्हेन्यु रेकॉर्ड मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार श्री. ए. रामकृष्णन यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथिल**
**खालील वर्णनाची मिळकत**

| अनु क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ (हे आर-प्र.) | आकार (रु.-पै.) |
|---|---|---|---|
| १ | ८/१ (पै)<br>(खाते क्र. ९९) | ०-४०-० | ०-७८ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेन्ट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, भाडेकरू पणाचा हक्क, साठेकरार, कुळमुखत्यारपत्राने करार, मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी, इतर वारसांनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, आक्षेप, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती, आक्षेप, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/११/२०२४
ठिकाण: पनवेल

मार्फतः
ॲड. दीपा बिष्ट,
द्वारा तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४०,
ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर,
केम्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६.
ई-मेल: adv.deepabisht@gmail.com

# नव्या वर्षापासून ई-कचरा वाहतूक

## नवी मुंबई महापालिका करणार संकलन उपक्रमाचा प्रारंभ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील दोन वर्षे सातत्याने कचरा वाहतूक व संकलन कामाला मुदतवाढ दिली जात होती, परंतु अखेरीस नव्या वर्षात बहुचर्चित ९०२ कोटी खर्चाच्या कचरा वाहतूक व संकलन कामाची सुरुवात होणार आहे. नवी मुंबई महापालिकेने या नव्या कामाचा कार्यादेश दिला असून प्रथमच ई-कचरा वाहतुकीलाही सुरुवात होणार आहे. पालिकेच्या कचरा वाहतूक ठेक्याची मुदत संपून दोन वर्षे झाल्यानंतरही सातत्याने मुदतवाढ देण्यात येत होती.



महापालिकेने कचरा वाहतूक व संकलनाची निविदा प्रसिद्ध केली होती. त्यानंतर महापालिकेतर्फे प्रथमच कचऱ्याची ई-वाहतूक सुविधाही राबवली जाण्याचे निश्चित करण्यात आले होते; परंतु निविदा प्रक्रियेसाठी अवधी लागल्याने तसेच देशपातळीवर स्वच्छ शहराचा बहुमान असलेल्या शहरात आगामी काळात कचरा संकलनात विविध सुधारणा करत ई-कचरा म्हणजे इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या कचऱ्याची वाहतूक व्यवस्था करण्यात तसेच निविदा निश्चित करण्यासाठीही अवधी लागला होता.

सध्या सतत मुदतवाढ देण्यात येत असलेले काम २४०० रुपये टनाप्रमाणे दिले होते. त्यामुळे या वेळची निविदा १०० कोटीपार होणार हे निश्चितच होते. महापालिकेने शहर स्वच्छतेबरोबरच कचरा वर्गीकरणाकडे अधिक लक्ष केंद्रित केले आहे. नवी मुंबई महापालिकेने कचरा वाहतूक व संकलनासाठी मार्च २०१५ ते मार्च २०२२ पर्यंत शहरातील कचरा वाहतूक व संकलनाच्या ठेकेदाराला काम दिले होते, परंतु संबंधित ठेकेदाराची मुदत संपल्याने पालिकेने याच ठेकेदाराला कामासाठी मुदतवाढ दिली आणि ती सातत्याने वाढवली. आता पालिकेने नुकताच कामाचा कार्यादेश दिला आहे.

### कचरा वर्गीकरण व्याप्ती वाढली

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नव्या निविदेत कचरा वर्गीकरणाची व्याप्तीही वाढवली आहे. घरगुती घातक कचरा वर्गीकरण तसेच प्लास्टिक, लाकूड, काच, धातू अशा कचऱ्याचे वर्गीकरण करून कचरा संकलन केले जाणार आहे. कचरा वाहतुकीसाठीही प्रथमच छोट्या इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर करण्यात येणार आहे.

### ४० ई-वाहनांचाही वापर

सध्या पालिकेत कचरा वाहतुकीसाठी ११० गाड्या वापरल्या जात असून नव्या निविदेत मोठ्या कॉम्पॅक्टरसह एकूण २४६ गाड्या वापरल्या जाणार असून त्यात ४० ई-वाहनांचा वापर करण्यात येणार आहे.

कचरा वाहतूक व संकलन निविदा शहरासाठी महत्त्वपूर्ण असून शहराचा देशात स्वच्छतेबाबत नावलौकिक आहे. तो टिकवण्यासाठी पालिका योग्य ती खबरदारी घेत असल्याचे पाहायला मिळत असून त्याची अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे.

**कचरा संकलनासाठी ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला असून नव्या निविदेनुसार कामाला सुरुवात करण्यात येत आहे. कचरा वाहतूक व संकलनासाठी ई-वाहनांचा वापर केला जाणार आहे.**
**-सुनील पवार, अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई मनपा**

# आमदार महेश बालदींना विजयी करा

## भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर यांचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

उरण विधानसभा निवडणुकीत आमदार महेश बालदी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन भाजपचे उरण तालूका अध्यक्ष रवी भोईर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले आहे.



उरण विधानसभा क्षेत्रातील इमानदार नेतृत्व करणारे हक्काचे आमदार म्हणून ओळख असणारे, उरण-पनवेल-खालापूर मतदार विकास कामे करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ते पोहचवण्याचे कसब असणारे व्यक्तिमत्व म्हणजे आमदार महेश बालदी यांचा जन्म उरण शहरातील असून, त्यांचे शिक्षण येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे.

लहानपणापासून सामाजिक क्षेत्राची आवड आणि त्याला लाभलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार यामुळेच जनसेवेच व्रत घेऊन तरुण वयातच राजकीय क्षेत्रात पदार्पण झालेल्या या नेतृत्वाने जमेल तेथे हात जोडून अन्यथा वेळ पडल्यास संघर्ष या संघर्ष योध्याने जनसामान्यांचे काम अविरतपणे सुरू ठेवले.

या दमदार कार्यशैलीने एक सामान्य भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता चार वेळा उरण नगर परिषदेचा नगरसेवक त्यानंतर नगराध्यक्ष देशातील पहिल्या क्रमांकावर असलेल्या जेएनपीए बंदराचे विश्वस्त आणि कार्यकर्त्यांच्या पाठबळावर व सामान्य मतदारांच्या आशीर्वादावर आत्ता उरण विधानसभा मतदार संघावर मागील पाच वर्षे प्रवास पूर्ण केला आहे.

उरण पनवेल, खालापूरसह संपूर्ण रायगड भारतीय जनता पक्ष वाढविण्यात महत्वाची भूमिका बजावली असून जाती, धर्म निरपेक्ष विचार आणि विकासाचा दृष्टिकोन यामुळे सर्वच जाती धर्मांचे नागरिकांनी त्यांची सोबत केली आहे. प्रत्येकाला मदत करणारा आणि हाकेला धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाल्याने केंद्रापासून राज्य सरकार मधिल विविध मंत्री नेते यांच्या समावेत त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित आहेत.

उरण मतदार संघात विकास प्रकल्प आणि त्याला लागणाऱ्या परवानग्या, विकास निधी खेचून आणून ते पूर्णतः वास नेण्याची त्यांची खासियत सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांच्या या कार्य कुशल पद्धतीमुळे आणि खंबीर नेतृत्वामुळे उरण, पनवेल आणि खालापूर येथील झालेला अभूतपूर्व विकास यामुळे होऊ घातलेल्या उरण विधानसभा निवडणुकीत आमदार महेश बालदी यांना पुन्हा एकदा मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन भाजपाचे उरण तालूका अध्यक्ष रवी भोईर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# दिवाळेतील अनधिकृत बांधकामावर हातोडा



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर ए विभागातील दिवाळे कोळीवाडा येथे सुरू असलेल्या अनधिकृत दोन मजली इमारतीच्या बांधकामांवर सिडकोच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली.

नवी मुंबई महापालिकेच्या बेलापूर ए विभागात दिवाळे कोळीवाडा सेक्टर १४, सर्व्हे क्र. ४५३मधील चालू इमारतीचे नव्याने बांधकाम सुरू केले होते. या बांधकामावर सिडकोच्या अतिक्रमण विभागाने पोकलेनच्या साहाय्याने कारवाई करून संपूर्ण आरसीसी बांधकाम निष्कासित करण्यात आले.

सिडकोचे अनधिकृत बांधकामे अतिक्रमण विभागाचे मुख्य नियंत्रक डॉ. जगन्नाथ वीरकर आणि सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली.

# नेरूळमध्ये घरफोडी

**नवी मुंबई : बातमीदार**

बंद घरात चोरी झाल्याची घटना नेरूळमध्ये घडली आहे. नेरूळ सेक्टर २० येथे राहणाऱ्या शैलाबी पठाण यांच्या घरी हा प्रकार घडला आहे.

सोमवारी रात्री त्यांचे घर बंद असताना दरवाजाचे कुलूप तोडून चोर आत शिरले. चोराने घरातील रोकड व दागिने असा दोन लाख ४५ हजारांचा ऐवज लंपास केला.

या प्रकरणी नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गजबजलेल्या परिसरात चोऱ्या होऊ लागल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

# वाशीमध्ये मिठाईच्या दुकानात चोराचा डल्ला

**नवी मुंबई : बातमीदार**

मिठाईच्या दुकानातील गल्ल्यावर चोराने डल्ला मारला. ही घटना वाशीत घडली. या प्रकरणी वाशी पोलिसांनी दोन अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे. दिवाळीच्या दिवशी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात मिठाई खरेदी केल्याचे हेरून चोरांनी त्या ठिकाणी चोरी केली आहे.

वाशी सेक्टर १७ येथील मिठाईच्या दुकानात हा प्रकार घडला आहे. दिवाळीनिमित्ताने भेट देण्यासाठी किंवा घरी खाण्यासाठी मिठाई खरेदी करीत होते. यामुळे सोनारानंतर मिठाईची दुकाने ग्राहकांनी भरल्याचे चित्र सर्वच ठिकाणी होते. अशीच गर्दी वाशीतील भरत शर्मा यांच्या दुकानातदेखील होती, मात्र सण असल्याने व गर्दी असल्याने त्यांना रात्री दुकान बंद करण्यास उशीर झाला. त्यामुळे नफ्याची रक्कम गल्ल्यातच ठेवून ते घरी गेले होते.




दुसऱ्या दिवशी सकाळी दुकानाच्या ठिकाणी आले असता शटर उचकटलेल्या अवस्थेत दिसून आले. यामुळे गल्ल्यातील रोकड तपासली असता ती मिळून आली नाही. सीसीटीव्ही तपासले असता दोघे जण दुकानातील रोकड चोरताना दिसून आले. त्यांनी दुकानाच्या गल्ल्यातील एक लाख पाच हजारांची रोकड पळवली आहे. यासंदर्भात मंगळवारी त्यांनी वाशी पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यावरून अज्ञात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिक्षकांच्या मनपास्तरीय प्रशिक्षणास सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शैक्षमिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, राहटोली, ठाणे अंतर्गत नवी मुंबई पालिका कार्यक्षेत्रात असणाऱ्या मनपाच्या सर्व माध्यमाच्या ८२ नवनियुक्त शिक्षकांचे मनपास्तरीय प्रशिक्षणास पालिका शाळा क्र. २८, वाशी येथे सुरुवात झाली.

प्रशिक्षणास नवी मुंबई शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी बारघरे व चंद्रप्रकाश पाल हे उपस्थित होते. तर समग्र शिक्षाचे सर्व विषयतज्ञ, विशेष शिक्षक हे सुलभकही उपस्थित होते.

नव्याने शिक्षणप्रक्रियेत येणाऱ्या शिक्षकांना या व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील मूलभूत बाबींचा परिवय व्हावा, त्यांना आपले कार्य परिणामकारकरीत्या करता यावे, तसेच शिक्षणव्यवस्थेच्या त्यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षा प्रभाविपणे पूर्ण करता याव्यात या उद्देशाने प्रशिक्षणाचे नियोजन आयोजन व्यवस्थितरित्या आढळते.

# नवी मुंबईत छट्पूजा उत्साहात साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात विविध ठिकाणी महाछट पूजा उत्साहात साजरी करण्यात आली. जवळजवळ हजारोंच्या संख्येने उत्तर भारतीय बांधव नवी मुंबईतील सार्वजनिक तलावांच्या येथे उपस्थित होते.

पालिकेने दिलेल्या स्वच्छतेच्या नियमांचे पालन करत छट पूजा साजरी करण्यात आली. सूर्याला अर्घ्य अर्पण करून पूजा करण्यात आली. नवी मुंबईत पालिकेच्या आठही विभागांतील तलावांवर तसेच ज्वेल ऑफ नवी मुंबई, वाशी चौपाटी येथे मोठ्या प्रमाणात उत्तर भारतीय नागरिक जमले होते. त्यांनी साग्र संगीत पूजा केली.

हिंदी वर्षानुसार शुक्लपक्ष चतुर्थीनुसार छट पूजेला सुरुवात होते. एकूण चार दिवस हा सण उत्तर भारतीयांकडून साजरा करण्यात येतो. बुधवारी षष्ठी असल्यामुळे सर्व भाविक पाण्यात उभे राहून सुर्यास्तापासून पूजा केली. चतुर्थी आणि पंचमी या दोन दिवसांत आपल्या घरीच हा सण साजरा केला जातो. तर षष्टीला सूर्यास्ताच्या वेळेपासून ते रात्री ८ वाजेपर्यंत सूर्याची पूजा पाण्यात उभी राहून केली जाते तर दुसऱ्या दिवशी म्हणजेच सप्तमीला पहाटे ५ वाजल्यापासून ते सूर्योदय होईपर्यंत सूर्याची पूजा केली जाते. या पूजेला लहांनापासून मोठ्यांपर्यंत अगदी सर्व कुटुंब जातीने हजर होते. या वेळी स्त्रिया विविध सांस्कृतीक गाणी म्हंटली व पूजा केली. या वेळी गव्हासारख्या विशिष्ठ पदार्थाचा नैवेद्य दाखवण्यात आला तसेच त्याचबरोबर विविध फळेदेखील नैवेद्य म्हणून दाखविला गेला.

दिवाळी झाल्यावर चार दिवसांनी या सणाला सुरुवात होते. उत्तर भारतीयांमध्ये दिवाळी नंतरचा सर्वांत मोठा सण छाटपूजा हा समजला जातो. हा सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच नदी, तलाव, समुद्र किनाऱ्यावर साजरा करण्यात येतो. या सणाला स्त्री आणि पुरुष असे दोघेही पूजा करतात. आपल्या आयुष्यात आनंद, भरभराट येण्यासाठी आणि दुःखाचे हरण होण्यासाठी सूर्याची पूजा केली जाते.

दिल्ली, उत्तरप्रदेश, आसाम, बंगाल, बिहार, झारखंड, ओरिसा या राज्यांमध्ये अगदी आनंदात घरोघरी हा सण साजरा करतात तर मुंबईत जुहू चौपाटीवर सर्वांत मोठ्या प्रमाणात हा सण साजरा केला जातो.

# महिलेवर चाकूहल्ला

**नवी मुंबई :** विकासक व त्याच्या साथीदारांनी जागा मालकाच्या बायकोवर चाकूहल्ला केल्याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात दाखल झाली आहेत. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घणसोली गाव परिसरात राहणाऱ्या व्यक्तीने त्याचा भूखंड विकसित करण्याचा ठेका तुर्भेतील विकासकाला दिला होता. या वेळी जागा मालकाला आठ, तर विकासकाला सात घरे मिळतील, असा दोघांमध्ये करार झाला होता, परंतु बांधकाम पूर्ण झाल्यानंतर विकासकाने केवळ सात घरे दिल्याने जागा मालकाने तीन घरांना टाळे लावले होते. यावरून त्यांच्यात वाद सुरू असताना मंगळवारी विकासक त्या तीन घरांचे टाळे तोडण्यासाठी आला असता पुन्हा वाद झाला. या वेळी विकासक व त्याच्या साथीदारांनी आपल्या पत्नीवर चाकूने हल्ला केल्याचा आरोप जागामालकाने केला आहे.

# घरे सोडत अर्ज नोंदणीसाठी सिडकोकडे मुदतवाढीची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुका जाहीर होण्याच्या काही दिवसच आधी सिडकोने २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेला सुरुवात केली. आतापर्यंत ६८ हजार अर्जदारांनी या सोडतीसाठी नोंदणी केली आहे. सोडतीसाठी लागणारे उत्पन्नाचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र यांसारखी सरकारी कागदपत्रे मिळविण्यासाठी अर्जदारांना सरकारी कार्यालयांत जावे लागत आहे. महसूल विभागाचे निम्म्याहून अधिक कर्मचारी निवडणूक कामात व्यग्र असल्याने कागदपत्रे मिळविण्यासाठी अर्जदारांना आणखी मुदतीची गरज भासत आहे.



सिडकोने या सोडतीची अर्जनोंदणीची अखेरची मुदत ११ नोव्हेंबर ही जाहीर केल्याने इच्छुक ग्राहकांकडून आणखी महिनाभर तरी अर्जनोंदणीसाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी सिडको दरबारी होत आहे. मागील अनेक वर्षांपासून सिडकोच्या 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या महागृहनिर्माण योजनेच्या नागरिक प्रतीक्षेत होते. यावेळच्या सिडको सोडतीमधील घरे बाजारभावापेक्षा १० टक्के कमी दराने मिळतील, अशी घोषणा सिडको मंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी केली होती.

प्रत्यक्षात या सोडतीमधील घरांच्या किमती किती असतील हे सिडकोने अजूनही जाहीर केलेले नाही. तरी स्वस्त घरे वाशी, खारघर, मानसरोवर रेल्वे स्थानक आणि खांदेश्वर रेल्वेस्थानक येथे मिळतील, या अपेक्षेने ६८ हजार नागरिकांनी त्यांची अर्जनोंदणी केली आहे.

या योजनेमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी राखीव घरे आहेत. इच्छुक नागरिक सिडकोच्या https:. cidcohomes.com या संकेतस्थळावर त्यांची अर्जनोंदणी करू शकतील. सिडको मंडळाने या वेळी जाहीर केलेल्या सोडत प्रक्रियेत अर्जनोंदणी करतानाच अर्जदाराने जात प्रवर्गाचा दाखला, आर्थिक उत्पन्न श्रेणी, अधिवास प्रमाणपत्र अशी कागदपत्रे जमा केल्यावरच पुढील प्रक्रियेत अर्जदाराला सहभाग घेता येईल असे नियम केले. त्यामुळे घराची किंमत माहिती नसली तरी सिडकोची घरे बाजारभावापेक्षा स्वस्त मिळणार असल्याने ६८ हजार नागरिकांनी अर्जनोंदणी केली असून एक लाखांहून अधिक अर्जदार सहभाग घेतील असा विश्वास सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आहे. त्यामुळे ११ डिसेंबरपर्यंत या योजनेसाठी अर्ज नोंदणीसाठी मुदत दिली जाईल यासाठी सिडकोत हालचाली सुरू आहेत.

अजूनही अर्जनोंदणीसाठी पाच दिवस शिल्लक असल्याने ११ नोव्हेंबरनंतर मुदतवाढ मिळेल का या प्रतीक्षेत सामान्य नागरिक आहेत. याबाबत सिडकोची प्रतिक्रियेसाठी जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

**अर्जनोंदणी करताना सरकारी विविध कागदपत्रे अर्ज नोंदणीबरोबरच जोडावीत अशी मुख्य अट असल्याने ती मिळविण्यासाठी दिलेली मुदत पुरेशी नाही. निवडणूक कामात अधिकारी गुंतल्याने कागदपत्रे मिळविण्यासाठी धावाधाव होत आहे. त्यामुळे सिडकोचे एमडी विजय सिंघल यांनी अर्जनोंदणीची मुदतवाढ देणे गरजेचे आहे.**
**-अरविंद पाटील, सामाजिक कार्यकर्ता, वाशी**

# नफ्याच्या बहाण्याने गंडा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून नफा मिळवण्याच्या बहाण्याने २० लाखांची फसवणूक झाली आहे. वाशी परिसरात राहणाऱ्या ५६ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे.

शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करून नफा मिळवण्याचा प्रयत्न चांगलाच महागात पडला आहे. सोशल मीडियाद्वारे मिळालेल्या लिंकवर विश्वास ठेवून प्रतिसाद दिला होता तसेच व्हॉट्सअॅपवरील संभाषणावरून संबंधितांच्या सांगण्यावरून त्यांच्या खात्यात २० लाख रुपये भरले होते. त्यानंतर मात्र त्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला अथवा मूळ रक्कम परत करण्यात आली नाही.

यावरून आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. याप्रकरणी त्यांनी वाशी पोलिसांकडे तक्रार केली असून, अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.




# नवी मुंबईत विविध समाज घटकांमध्ये मतदार जागृती



**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली व बेलापूर विधानसभा निवडणूक कार्यालयांप्रमाणेच नवी मुंबई महापालिकेच्या वतीनेही महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त तथा दोन्ही मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली स्थानिक पातळीवर विविध समाज घटकांपर्यंत पोहचविणे जनजागृती करण्यात येत आहे.




या अंतर्गत विविध ठिकाणी नाका कामगारांशी संवाद साधून त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्याचप्रमाणे २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात आले. यामध्ये १५० ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या स्वीप नोडल अधिकारी अभिलाषा म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वीपचे अधिकारी, कर्मचारी यांनी रबाळे आणि तळवली नाका तसेच सेक्टर ४ ऐरोली येथील नाक्यांवरील नाका कामगारांची भेट घेत त्यांच्यामध्ये मतदान करण्याविषयी जागरुकता निर्माण केली.

अशाच प्रकारे ऐरोली विभागात चिंचपाडा व गणेशनगर येथील रहिवाशांना मतदानाचा भारतीय संविधानाने दिलेला अधिकार बजावण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी नमुंमपा शाळा क्रमांक ५३ चिंचपाडा येथे नागरिकांना एकत्र करुन सामुहिकरित्या मतदार प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली. याप्रसंगी अतिरिक्त स्वीप नोडल अधिकारी उपायुक्त संतोष वारुळे व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नवी मुंबईतील विविध समाज घटकांशी संपर्क साधून २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूकीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे व या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढविण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

# कर्जतमध्ये महिला मतदारांची संख्या अधिक

## ● निवडणूक यंत्रणा सज्ज; अधिकाऱ्यांची पत्रकार परिषदेत माहिती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी यंत्रणेच्या तयारीची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली. कर्जत मतदारसंघात पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदार अधिक आहेत, तर पाच तृतीयपंथी मतदार आहेत.

१८९ कर्जत विधानसभा मतदारसंघातील निवडणूक यंत्रणेच्या माहितीसाठी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या वेळी सहनिवडणूक निर्णय अधिकारी डॉ. धनंजय जाधव उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी संकपाळ यांनी कर्जत मतदारसंघाची माहिती दिली. मतदारसंघात एकूण ३६२ मतदान केंद्र असून तीन लाख १८ हजार ७४५ मतदार आहेत. त्यात पुरुष मतदार एक लाख ५९ हजार २९३ तर महिला मतदार संख्या एक लाख ५९ हजार ४४६ मतदार असून पाच तृतीयपंथीय मतदार आहेत. कर्जत मतदारसंघात पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे.



दोन मतदार केंद्र दुर्गम भागातील मतदार केंद्र असून दोन्ही ठिकाणी वाहने जातात. तुंगी आणि पेठ या दोन्ही गावे एक हजारहून अधिक फूट उंचीवर असून या दोन्ही ठिकाणी वाहने जात असल्याने निवडणुकीचे दिवशी मतदान करणे सोपे जाईल. कर्जत आणि खालापूर तालुक्यात एकही अतिसंवेदनशील मतदान केंद्र नाही. मतदारांना आकर्षित करण्यासाठी गुलाबी मतदार केंद्र उभारले जाणार असून त्या मतदान केंद्रावर सर्व मतदान कर्मचारी हे महिला असणार आहेत, तर अपंग कर्मचारी असलेलेदेखील मतदान केंद्र असणार आहे. त्याशिवाय तरुणांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी मतदान केंद्र असणार आहेत. कर्जत मतदारसंघात ३६२ मतदान केंद्र असून त्यात १५५ तर ठिकाणी एक मतदान केंद्र तर ५४ ठिकाणी दोन मतदान केंद्र आणि ११ ठिकाणी चार तर प्रत्येकी दोन ठिकाणी पाच आणि सहा मतदान केंद्र ठेवण्यात आली आहेत.

या मतदारसंघात १३०० मतदार हे पोस्टल मतदान करणार असून अपंग आणि ८५ वर्षेवरील १९२ मतदार यांनी गृह मतदान करण्याचे पर्याय निवडला आहे. देशसेवा करीत असलेले ६८ मतदार कर्जत मतदारसंघात आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश सकपाळ यांनी दिली.

### प्रशासकीय भवनात होणार मतमोजणी

*कर्जत विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी प्रशासकीय भवनमधील पहिल्या मजल्यावर होणार आहे. याच कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर स्ट्राँग रूम बनविण्यात आली असून तेथे मतदान यंत्र ठेवण्यात येणार आहे. प्रशासकीय भवनमधील सर्व हालचाली यांचे सीसीटीव्ही चित्रण सुरू आहे. ते सर्व सीसीटीव्ही चित्रण पोलीस ठाण्यात बघता येणार आहे.*

# कोलाड-खांब परिसरात भातकापणी

## सुवर्णा, कोलम, रत्ना वाणांचे चांगले पीक

**रोहा : रामप्रहर वृत्त**



रोहा तालुक्यात भातशेतीच्या कापणीला दसऱ्यानंतर सुरुवात केली जाते, परंतु यावर्षी परतीच्या पावसामुळे भातशेती आडवी झाली. यामुळे मोठे नुकसान झाले आहे. आता उरलेल्या पिकाच्या कापणीला दिवाळीनंतरच सुरुवात करण्यात आली.

कोलाड-खांब परिसरात प्रामुख्याने भातपिक घेतले जाते, परंतु पाऊस लांबल्याने भातपिक भुईसपाट झाले आहे. थोडे फार वाचलेले भातपिक वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची भातकापणीची लगबग सुरू झाली आहे. भातकापणीनंतर दोन ते तीन दिवस ऊन देणे आवश्यक आहे. नंतर भारे बांधून मळणी रचली जाते यामुळे भाताच्या दाण्याला ऊब मिळते व दाणा खरडण्यास मदत होऊन तांदूळ उत्तम प्रकारे मिळतो, परंतु आता पावसाच्या भीतीमुळे उरलासुरलेला भात पदरात पाडण्यासाठी एकीकडे भातकापणी केली जात आहे, तर दुसऱ्या बाजूला भात झोडणीचे काम केले जात आहे.

यावर्षी रायगड जिल्ह्यात यावर्षी ९६ हजार हेक्टर क्षेत्रात भातलागवड करण्यात आली. यामध्ये सुवर्णा, कोलम, रत्ना व इतर भात पिकांना शेतकर्यांनी प्राधान्य दिले. यावर्षी हवामान खात्याने अंदाजानुसार पाऊस उत्तमप्रकारे झाला व भातपिकही चांगले आले, परंतु परतीचा पाऊस लांबल्यामुळे भातपिके आडवी झाली यामुळे यंत्राच्या साहाय्याने भातकापणी करणे शक्य नाही. यामुळे भातकापणी करताना विलंब होताना दिसत आहे.

# कोयना प्रकल्पग्रस्तांचा आमदार महेंद्र थोरवे यांना पाठिंबा

**चौक : प्रतिनिधी**



कर्जत-खालापूर विधानसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांना खालापुरातील कोयना प्रकल्पग्रस्त वसाहतीतील मतदारांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी आपल्या प्रचाराचा नारळ कोयना प्रकल्पग्रस्त पाचगाव वडवळ येथील जागृत देवस्थान वाघजाई मंदिरात फोडला. कोयना प्रकल्पग्रस्तांच्या नोकरी, पर्यायी जमीन, प्रकल्पग्रस्त दाखले, नागरी सुविधा, विस्तारित गावठाण, जमीन व गावठाण मोजणी अशा प्रकारच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. आमदार महेंद्र थोरवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या दोन बैठका घेऊन समस्या मांडल्या. त्यानंतर पुनर्वसन सचिव, कोकण आयुक्त, पुणे आयुक्त यांच्याबरोबर चर्चा केली.

रायगड जिल्हाधिकाऱ्यांसोबतही त्यांनी बैठक आयोजित करून प्रकल्पग्रस्त जनतेला दिलासा दिला आहे. काही प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत, तर काही कामांच्या फाईल तयार आहेत. माजी आमदार देवेंद्र साटम यांच्यानंतर प्रामाणिक काम आमदार महेंद्र थोरवे यांनी केले आहे. म्हणून कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या हितासाठी निर्णय घेतल्याने खालापूर तालुक्यातील कोयना प्रकल्पग्रस्त वसाहतीमधील सर्वपक्षीय जनतेने महेंद्र थोरवे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

# जावळी शाळेतर्फे मतदार जागृती

**माणगाव : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून सर्व मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून निर्भयपणे मतदान करावे, यासाठी राजिप शाळा जावळीतर्फे मतदार जनजागृती अभियान फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

सोबत मतदारांनी मतदान करणार असल्याबाबतचे संकल्प पत्र भरून दिले. गावातील मतदार बंधू आणि भगिनींनी सदर जनजागृती फेरीस उदंड प्रतिसाद दिला. मतदार जनजागृती फेरीसाठी शाळेचे मुख्याध्यापक निलेश उभारे, उपशिक्षिका विद्या लोमटे, अंगणवाडीसेविका सुनिता साजेकर यांनी नियोजन केले होते. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिया पालकर, सदस्य सिद्धी पालकर, पोलीस पाटील बाळा पालकर यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी सायकल रॅली काढून मतदारांना मतदानासाठी आवाहन करण्यात आले.





**अलिबाग : विधानासभा निवडणुकीच्या आचारसंहितेदरम्यान पेझारी चेकपोस्ट नाका येथे स्टॅटिक सर्वेलन्स टीमकडून अलिबागमध्ये येणाऱ्या प्रत्येक वाहनाची काटेकोरपणे तपासणी केली जात असून चालकांचीही माहिती घेतली जात आहे.**

# खांडस ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत खांडस ग्रामस्थांनी हभप शांताराम महाराज ऐनकर, हभप शंकर महाराज भोईर, हभप रवींद्र महाराज ऐनकर यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.५) शिवसेनेत प्रवेश केला.

यामध्ये शांताराम ऐनकर, नंदू ऐनकर, रवींद्र ऐनकर, रमेश भोळे, रुपेश ऐनकर, दत्तात्रेय ऐनकर, ज्ञानराज ऐनकर, बाळू दळवी, मधुकर ऐनकर, भास्कर काठे यांचा समावेश आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जतमध्ये कोट्यवधींची विकासकामे केली आहेत. त्याचप्रमाणे महायुतीच्या सरकारने विविध योजना राबवून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचे काम केले आहे. त्यामुळे आम्ही महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांना पाठिंबा देत असल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले.

या वेळी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, जिल्हा संघटक संभाजी जगताप, जिल्हा संघटक अरुण देशमुख, तालुकाप्रमुख सुदाम पवाळी, आदिवासी सेल विधानसभा अध्यक्ष गणेश केवारी, सहसंपर्कप्रमुख हर्षद विचारे, उपतालुकाप्रमुख मिलिंद विरले, तालुका प्रवक्ते विलास श्रीखंडे, खालापूर तालुका सल्लागार चंद्रकांत फावडे, तसेच दशरथ ऐनकर, कैलास महाराज भोईर, मालू खंडवी तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# उमेदवारांनी निवडणूक खर्च कागदपत्रे तपासणीकरिता सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूक २०२४मध्ये कर्जत, श्रीवर्धन व अलिबाग विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांनी खर्च नोंदवही, निवडणूक खर्चासाठी उघडलेली स्वतंत्र बँक खाते पासबुक, निवडणूक खर्चाची प्रमाणके व उपप्रमाणके, रोख रक्कम तपशील इत्यादी व निवडणूक खर्चाशी संबंधित इतर अनुषंगिक कागदपत्रे निवडणूक खर्च निरीक्षकांसमोर तपासणीकरिता सादर करावीत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केले आहे.

कर्जत विधानसभा उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी १०, १४ व १८ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६.३० या वेळेत प्रशासकीय भवन, पोलीस ग्राऊंडच्या शेजारी कर्जत येथे होणार आहे. श्रीवर्धन विधानसभा उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी ९, १२ व १७ नोव्हेंबर रोजी श्रीवर्धन मध्यवर्ती प्रशासकीय भवन येथे होणार आहे, तर अलिबाग विधानसभा उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी ८, १२ व १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा., अलिबाग नगर परिषद, दुसरा मजला येथे होणार आहे. तपासणीवेळी उमेदवाराने आपले खर्च रजिस्टर नोंदवही विहित पद्धतीने सादर न केल्यास त्यांच्यावर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ व भारतीय दंडसंहितेच्या कलम १७१-१ अन्वये पुढील कार्यवाही प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये सुधाकर घारे यांची प्रचार फेरी

**कर्जत : प्रतिनिधी**


विधानसभा मतदारसंघातील परिवर्तन विकास आघाडीचे अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांनी कर्जत शहरातून प्रचारफेरी काढली. या वेळी त्यांनी व्यापारी व नागरिकांची भेट घेऊन संवाद साधला.

आमराई येथून प्रचारफेरीचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, भरत भगत, शिवाजी खारीक, भगवान भोईर, धोंडू राणे, अशोक सावंत, राजाभाऊ कोठारी, दीपक श्रीखंडे, ॲड. स्वप्नील पालकर, जगदीश देशमुख, मदन परमार, रविंद्र दाभणे, अविनाश कडू, बळीराम देशमुख, भानुदास मिसाळ, संतोष नीलधे, अरविंद जैन, प्रकाश ओसवाल, अतुल कडू, सोमनाथ पालकर आदी व व्यापारी उपस्थित होते.



# लांबलेल्या पावसामुळे आंबा हंगामही लांबणीवर

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात या वर्षी पाऊस लांबला. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पाऊस पडला. सरासरी चार हजार मिमीपेक्षा अधिक पाऊस झाला. पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे जमिनीत अद्याप ओलावा टिकून आहे. ओलाव्यामुळे आंब्याच्या झाडाला पालवी मोठ्या प्रमाणावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोहोराची प्रक्रिया उशिराने सुरू होऊन आंबा हंगाम लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यात एकूण १४ हजार हेक्टर क्षेत्रावर आंबा लागवड करण्यात आली आहे. उत्पादनक्षम क्षेत्र १२ हजार ५०० हेक्टर इतके आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पडलेल्या पावसामुळे जमिनीत ओलावा कायम आहे. ऑक्टोबर महिन्यात उष्म्यामुळे जमिनीतील ओलावा नष्ट होतो. नोव्हेंबरपासून थंडी सुरू झाल्यावर मुळांना ताण बसून मोहराची प्रक्रिया सुरू होते, परंतु दिवाळी संपली तरी अद्याप थंडी जाणवू लागलेली नाही.

जमिनीतील ओलाव्यामुळे कलमांना पालवी सुरू झाली आहे. जुनी पानगळ होऊन नवीन पाने येत आहेत. पालवी जीर्ण होण्यासाठी किमान दीड ते दोन महिने लागतात. त्यानंतर मोहोर प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. नोव्हेंबरमध्ये मोहोर आल्यास फेब्रुवारीपर्यंत पहिल्या टप्प्यातील आंबा बाजारात येण्याची शक्यता असते, परंतु मोहोरच उशिरा आल्यास पहिल्या टप्प्यातील आंबा मार्च ते एप्रिल महिन्यामध्येच येण्याची शक्यता आहे.

गेली दोन वर्षे ऑक्टोबर हीटचे प्रमाण चांगले राहिल्याने नोव्हेंबरमध्ये पहिल्या टप्प्यात मोहर आला होता, मात्र डिसेंबरमध्ये झालेल्या पावसामुळे पहिल्या टप्प्यात मोहोर खराब झाला होता, परंतु या वर्षी नोव्हेंबर सुरू झाला तरी थंडी सुरू झालेली नाही. धुके मात्र पडत आहे. त्यामुळे मोहोर प्रक्रिया सुरू होण्यासाठी जानेवारी उजाडण्याची शक्यता आहे.

**या वर्षीही हंगाम लांबण्याची शक्यता आहे. निसर्गातील बदलाची नोंद विमा कंपन्या घेत नसल्यामुळे बागायतदारांचे नुकसान होत आहे.**
**-डॉ. संदेश पाटील, बागायतदार**

# माथेरान मिनीट्रेनला पर्यटकांचा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असणारी माथेरानची वनराणी पाच महिन्यांच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर बुधवारी (दि. ६) नेरळ रेल्वेस्थानकातून माथेरान स्थानकात दाखल झाली. या वेळी प्रवास करणाऱ्या पर्यटकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. दरम्यान, पहिल्याच दिवशी २१३ जणांनी या ट्रेनमधून प्रवास केला.

सकाळी ८ वाजून २५ मिनिटांनी मिनिट्रेन १११ प्रवाशांना घेऊन नेरळ येथून निघाली ती माथेरान स्थानकात ११ वाजून ३५ मिनिटांनी पोहचली. मिनीट्रेनचे चालक आणि स्टेशन प्रबंधक यांच्या हस्ते पूजा अर्चा करून व श्रीफळ वाढवत भंडारा उधळवून या ट्रेनचे स्वागत करण्यात आले, तर हिरवा झेंडा दाखवून ट्रेन माथेरान दिशेकडे रवाना झाली. दुसऱ्यात फेरीत मिनीट्रेनचा १०२ प्रवाशांनी लाभ घेतला.

# चित्रलेखा पाटील यांना ठाकरे गटाचा पाठिंबा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बुधवारी (दि.६) अलिबाग येथे बैठक झाली. या बैठकीत शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी महाविकास आघाडीतील शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना पाठिंबा जाहीर केला.

या बैठकीला शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, उमेदवार चित्रलेखा पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ, जिल्हा सल्लागार सतीश पाटील, रोहा तालुका प्रमुख समीर शेडगे, युवासेना जिल्हाअधिकारी अमीर ठाकूर, कैलास गजने, प्रमोद भायदे, अलिबाग तालुका संघटक हेमंत पाटील, अलिबाग तालुका संपर्क प्रमुख उपकार खोत, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका दर्शना पाटील, जिल्हा सहसंपर्क संघटिका शिल्पा घरत, शहर संघटिका राखी खरवले व शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका आज पहिला टी-२० सामना

**डर्बन : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चार सामन्यांच्या टी-२० मालिकेला शुक्रवार (दि. ८)पासून सुरुवात होत आहे. मालिकेतील पहिला सामना डर्बनच्या किंग्समीड मैदानावर खेळला जाईल. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८.३० वाजता सुरू होईल.

या मालिकेसाठी दोन्ही देशांचे संघ जाहीर करण्यात आले आहेत. सूर्यकुमार यादव टीम इंडियाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. तर दक्षिण आफ्रिकेच्या संघाचे नेतृत्व एडन मार्कराम करणार आहे.

मालिकेतील सर्व सामने वेगवेगळ्या मैदानावर खेळवले जाणार आहेत. पहिला सामना डर्बनमध्ये आणि पुढील तीन सामने अनुक्रमे १०, १३ आणि १५ नोव्हेंबर रोजी गेकेबेर्हा, सेंच्युरियन आणि जोहान्सबर्ग येथे खेळवले जातील.

स्पोर्ट्स १८च्या विविध चॅनेलवर भारतीय चाहते भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पहिला टी-२० थेट पाहू शकतात. चाहत्यांना जिओ सिनेमावर हा सामना मोफत पाहता येईल.



भारतीय संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, तिलक वर्मा, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजयकुमार विशाख, आवेश खान, यश दयाल.

दक्षिण आफ्रिकेचा संघ : एडन मार्कराम (कर्णधार), ओटनील बार्टमन, जेराल्ड कोएत्झी, डोनोव्हन फरेरा, रीझा हेंड्रिक्स, मार्को जॅनसेन, हेनरिक क्लासेन, पॅट्रिक क्रुगर, केशव महाराज, डेव्हिड मिलर, मिहलाली एमपोन्गवाना, नकाबा पीटर, रायन सिमेलेटोन, लुईस रिकेलटन आणि सिपमला (तिसरा आणि चौथा सामना), ट्रिस्टन स्टब्स.

**द्विपक्षीय मालिकेत भारताचा दबदबा**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या द्विपक्षीय टी-२० मालिकेत भारतीय संघाचे प्रदर्शन शानदार राहिलेले आहे. गेल्या पाच मालिकांमध्ये भारतीय संघ पराभूत झालेला नाही. या दरम्यान भारताने दोन मालिका जिंकल्या आहेत, तर तीन मालिका अनिर्णित राहिल्या. उभय देशांमध्ये आतापर्यंत नऊ द्विपक्षीय टी-२० मालिका खेळल्या गेल्या आहेत, ज्यामध्ये भारताने चार, तर आफ्रिकेने दोन विजय मिळवले आहेत, तर तीन मालिका अनिर्णित राहिल्या आहेत.


## आयपीएल मेगा लिलाव

# तब्बल १५७४ खेळाडूंमध्ये चुरस

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा मेगा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबरला सौदी अरेबियाच्या जेद्दा शहरात होणार असून त्यासाठी १५७४ खेळाडूंनी नावनोंदणी केली. त्यात इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सचे नाव नाही, मात्र त्याचा अनुभवी सहकारी जेम्स अँडरसन याच्यासह इटलीचा वेगवान गोलंदाज थॉमस ड्रेका आणि भारतात जन्मलेला अमेरिकेचा वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावळकर यांचा समावेश आहे.

नेत्रावळकरसह ड्रेका याची आयपीएल लिलावासाठी सध्या मोठी चर्चा रंगली आहे. त्याचप्रमाणे नामांकन करणाऱ्या अन्य स्टार खेळाडूंमध्ये ऋषभ पंत, श्रेयस अय्यर, लोकेश राहुल, रविचंद्रन अश्विन आणि युझवेंद्र चहल यांनी दोन कोटी रुपये या मूळ किमतीत स्वतःला उपलब्ध ठेवले आहे. याशिवाय खलील अहमद, मुकेश कुमार, व्यंकटेश अय्यर, आवेश खान, दीपक चाहर, इशान किशन, भुवनेश्वर कुमार, शार्दुल ठाकूर मोहम्मद सिराज, देवदत्त पडिक्कल, कृणाल पांड्या, हर्षल पटेल, प्रसिद्ध कृष्णा, टी. नटराजन, वॉशिंग्टन सुंदर आणि उमेश यादव यांचा देखील यादीत समावेश आहे.




सर्फराझ खान आणि पृथ्वी शॉ यांनी प्रत्येकी ७५ लाख किमतीत स्वत:ची नोंदणी केली आहे. सर्फराझला न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत एका दीडशतकाव्यतिरिक्त फारशी छाप पाडता आलेली नाही. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर असलेला पृथ्वी देशांतर्गत क्रिकेटमध्येही अडखळताना दिसत आहे. त्याचप्रमाणे यंदा कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या ४२ वर्षांच्या अँडरसनने पहिल्यांदाच आयपीएलमध्ये नोंदणी केली असून तो दहा वर्षाआधी २०१४मध्ये अखेरचा टी-२० सामना खेळला होता.

मागच्या वर्षी सर्वांत महागडा (विक्रमी २४.५० कोटी) ठरलेला ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क आणि इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर यांनी दोन कोटी रुपये मूळ किमतीत नोंदणी केली. मागच्या लिलावात अनसोल्ड राहिलेला ऑस्ट्रेलियाचा ऑफस्पिनर नॅथन लायन याने पुन्हा दोन कोटीच्या आधार किमतीत नोंदणी केली. अँडरसनची मूळ किंमत १.२५ कोटी ठेवण्यात आली आहे.

प्रत्येक संघ जास्तीत जास्त २५ खेळाडू (रिटेन खेळाडूंसह) खरेदी करू शकतो. दहा संघांनी ४६ खेळाडू रिटेन केले. एकूण २०४ खेळाडूंवर बोली लागणार असून त्यात ७० विदेशी खेळाडूंवर बोली लावावी लागणार आहे.

### सौरभ, ड्रेका चर्चेत

टी-२० विश्वचषकात शानदार कामगिरी करीत लक्ष वेधणारा भारतात जन्मलेला अमेरिकेचा वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावळकर हाही भाग्य अजमावणार आहे. त्याची मूळ किंमत ३० लाख आहे, तर इटलीचा २४ वर्षांचा वेगवान गोलंदाज थॉमस ड्रेका हा केवळ चार टी-२० सामने खेळला. त्याने ऑगस्टमध्ये ग्लोबल टी-२० लीगमध्ये कॅनडात दमदार कामगिरी करीत लक्ष वेधले होते. त्याला अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत ३० लाख किमतीत स्थान देण्यात आले.



## ऋषभ पंतने घेतले आईचे आशीर्वाद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २२ नोव्हेंबरपासून बॉर्डर गावस्कर ट्रॉफी सुरू होत आहे. या मालिकेसाठी टीम इंडियाचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत ऑस्ट्रेलियाला रवाना झाला आहे. त्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये तो त्याच्या आईबरोबर दिसत आहे.

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीसाठी ऋषभ पंत बुधवारी ऑस्ट्रेलियाला रवाना झाला. या वेळी तो त्याच्या आईबरोबर विमानतळावर पोहोचला होता. ऑस्ट्रेलियाला रवाना होण्यापूर्वी पंतने कारमधून उतरल्यावर आईचे आशीर्वाद घेतले आणि मग तो पुढे निघाला. पंतचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## ऑस्ट्रेलियाचा संघ भारताला ३-१ने नमवेल

**पाँटिंगचे भाकित**

**दुबई : वृत्तसंस्था**

भारताविरुद्ध पाच सामन्यांची बॉर्डर-गावसकर चषक कसोटी मालिका ऑस्ट्रेलिया ३-१ अशी जिंकेल. भारत केवळ एकच सामना जिंकू शकेल, कारण मोहम्मद शमीच्या अनुपस्थितीत कसोटीत २० बळी घेणे पाहुण्या संघासाठी सर्वांत अवघड आव्हान असेल, असे भाकीत ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंग याने केले आहे.

ऑस्ट्रेलियाचे लक्ष्य बॉर्डर-गावसकर चषक विजयाचा दुष्काळ संपविणे हेच असेल. भारताने २०१४-१५पासून सर्व चारही मालिका जिंकल्या. त्यात ऑस्ट्रेलियाच्या भूमीत झालेल्या २०१८-१९ आणि २०२०-२१ मालिकेचाही समावेश आहे. भारताला नुकताच आपल्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध ०-३ असा नामुष्कीचा पराभव पत्करावा लागला.

'आयसीसी रिव्ह्यू शो'मध्ये पाँटिंग म्हणाला की, ऑस्ट्रेलियाच्या विजयाची शक्यता आधीच्या तुलनेत बळावली. शमी दुखापतींमुळे मागच्या नोव्हेंबरपासून स्पर्धात्मक क्रिकेटमधून बाहेर आहे. त्याच्या



अनुपस्थितीत जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, आकाश दीप, प्रसिद्ध कृष्णा व पदार्पणाच्या प्रतीक्षेत असलेला हर्षित राणा या वेगवान गोलंदाजांमध्ये उणीव जाणवते. पाँटिंग म्हणाला, २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये सुरू होत असलेल्या मालिकेत भारत पूर्णपणे कमकुवत वाटत नाही. माझ्या मते भारत एक सामना जिंकेल. भारताच्या तुलनेत आमचा संघ अधिक स्थिर आणि अनुभवी वाटतो. त्यामुळे माझे मत ३-१ असे आहे, असे पाँटिंगने म्हटले.

शिवाय या मालिकेत स्टीव्ह स्मिथ किंवा ऋषभ पंतपैकी एक जण सर्वाधिक धावा काढू शकतो. स्मिथ सलामीऐवजी चौथ्या स्थानी फलंदाजी करणार असून स्वत:ला सिद्ध करण्याची त्याला संधी असेल, असेही पाँटिंगने नमूद केले.

## श्रेयस अय्यरची बॅट पुन्हा तळपली

### ओडिशाविरुद्ध शानदार द्विशतक



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाच्या मधल्या फळीतील स्टार फलंदाज श्रेयस अय्यर देशांतर्गत क्रिकेटमध्ये धमाकेदार कामगिरी करत आहे. रणजी ट्रॉफी स्पर्धेत मुंबई विरुद्ध ओडिशा सामन्यात द्विशतक झळकावले. या दुहेरी शतकासह त्याने निवड समितीचे लक्ष वेधले आहे, कारण श्रेयसला बऱ्याच दिवसांपासून भारतीय संघात स्थान मिळाले नाही.

श्रेयसने गुरुवारी (दि. ७) मुंबईतील बीकेसी ग्राऊंडवर ओडिशाविरुद्ध रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील आपले सलग दुसरे शतक तिसऱ्या प्रथम श्रेणी द्विशतकात रूपांतरित केले. महाराष्ट्राविरुद्धच्या त्याच्या मागील सामन्यात शतक झळकावणाऱ्या श्रेयसने आपला जबरदस्त फॉर्म दाखवून दिला आहे.

आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी श्रेयसला टीम इंडियात संधी मिळालेली नाही. आता भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या त्याच्या आशा पुन्हा जागृत झाल्या आहेत. या वर्षाच्या सुरुवातीला जेव्हा इंग्लंडने भारताला भेट दिली तेव्हा तो संघाचा भाग होता, परंतु शस्त्रक्रियेनंतर त्याच्या पाठीच्या समस्येमुळे त्याने विश्रांतीची निवड केली.

श्रेयसने अलीकडेच मीडियाशी बोलताना भारतीय संघात पुनरागमन करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मी माझी कामगिरी चांगली करण्यासाठी प्रयत्न करेन, असे त्या वेळी तो म्हणाला होता.

## हेझलवूड म्हणतो, टीम इंडियाला कमी लेखण्याची चूक करणार नाही!

**सिडनी : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्धच्या दारुण पराभवामुळे भारतीय खेळाडूंचा आत्मविश्वास खालावला असेल, मात्र त्यांच्यातील दमदार पुनरागमनाची क्षमता आम्हाला ठावूक आहे. त्यांना कमी लेखण्याची चूक आम्ही निश्चितपणे करणार नाही, असे वक्तव्य ऑस्ट्रेलियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडने केले आहे.

मायदेशातील कसोटी क्रिकेट मालिका ०-३ अशा फरकाने गमाविण्याची नामुष्की भारतावर ओढवली. यामुळे भारतीय खेळाडू मानसिकदृष्ट्या खचले असतील, ज्याचा आगामी बॉर्डर-गावस्कर करंडक मालिकेत ऑस्ट्रेलियाला फायदा होऊ शकेल, असे ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेटपटू अॅडम गिलख्रिस्ट आणि डेव्हिड वॉर्नर म्हणाले होते. हेझलवूडचेही असेच काहीसे मत असले, तरी या नव्या मालिकेत भारतीय संघ खेळ उंचावेल याचीही त्याला जाण आहे.



'न्यूझीलंडविरुद्धच्या अपयशामुळे भारतीय खेळाडू कदाचित खडबडून जागे झाले असतील. ते आमच्याविरुद्ध दमदार पुनरागमन करण्यास उत्सुक असतील. त्यांच्यातील क्षमता आम्हाला ठावूक आहे. आता ते कसे खेळतात हे मालिका सुरू झाल्यावरच कळेल,' असे हेझलवूड ऑस्ट्रेलियातील एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हणाला.

बॉर्डर-गावस्कर करंडकासाठी होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होईल. न्यूझीलंडविरुद्धच्या पराभवामुळे भारतीय संघाला जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्याचा मार्गही अवघड झाला आहे. अन्य संघांवर अवलंबून न राहता अंतिम फेरी गाठण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलियातील पाचपैकी चार सामने जिंकावे लागणार आहेत.

'भारतीय संघ मालिका ३-० अशी जिंकण्यापेक्षा ०-३ अशी हरून ऑस्ट्रेलियात येणे, जे आमच्यासाठी चांगलेच आहे. त्यांचा आत्मविश्वास काहीसा खालावला असेल. भारताचे बरेचसे खेळाडू यापूर्वी ऑस्ट्रेलियात खेळले आहेत, मात्र त्यांच्या काही फलंदाजांना इथे खेळण्याचा अनुभव नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलियातील खेळपट्ट्या आणि परिस्थिती कशी असणार याबाबत ते थोडे संभ्रमात असतील. आम्हाला याचा निश्चितपणे फायदा होऊ शकेल, परंतु आम्ही त्यांना कमी लेखण्याची चूक करणार नाही,' असे हेझलवूड म्हणाला.

## चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेची लवकरच होणार घोषणा

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसंदर्भात क्रिकेट चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता पाहायला मिळत आहे. या बहुप्रतिक्षित स्पर्धेसंदर्भात आता एक मोठी माहिती समोर येत आहे. पुढच्या आठवड्यातच आयसीसी मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखली जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या कार्यक्रमाची घोषणा करू शकते.

आयसीसीची एक टीम १० ते १२ नोव्हेंबरदरम्यान लाहोरला भेट देणार आहे. २०२५च्या चॅम्पियन्स ट्रॉफीसंदर्भातील व्यवस्थेची पाहणी ही टीम करेल. एवढेच नाही तर या भेटीदरम्यान एक कार्यक्रम निजोजित आहे. याचवेळी स्पर्धेच्या वेळापत्रकासंदर्भातील सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

पाकिस्तानमधील माध्यमांतील वृत्तानुसार, आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे वेळापत्रक सदस्य देशांसोबत आधीच शेअर केले गेले आहे. ११ नोव्हेंबरच्या कार्यक्रमात क्रिकेटपटूंसह प्रमुख व्यक्तींच्या उपस्थित आगामी स्पर्धेसंदर्भातील सविस्तर माहिती अधिकृतरित्या जाहिर करण्यात येईल.



प्रस्तावित वेळापत्रकानुसार यजमान पाकिस्तान संघासह भारत, बांगलादेश आणि न्यूझीलंड हे संघ 'अ' गटात ठेवण्यात आले आहेत. 'ब' गटात इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश असेल. या स्पर्धेसाठी भारतीय संघ पाकिस्तानात जाणार का? या प्रश्न अजूनही सुटलेला नाही. भारत सरकारने मंजुरी दिली तरच बीसीसीआय पुढची पावले उचलेल.

**असे असेल वेळापत्रक**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा १९ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२५ या कालावधीत खेळवली जाणार आहे. १० मार्च हा राखीव दिवस असेल. लाहोर, कराची आणि रावळपिंडीच्या मैदानात या स्पर्धेतील सामने नियोजित आहेत. फायनल सामना ९ मार्चला लाहोरमध्ये खेळवण्यात येणार आहे.

## ऑस्ट्रेलियात ध्रुव जुरेलने लाज राखली

### ऑस्ट्रेलिया 'अ' संघाविरुद्ध लढवय्या खेळी

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील भारतीय 'अ' संघ ऑस्ट्रेलिया 'अ' विरुद्ध दुसऱ्या अनौपचारिक कसोटी सामन्यासाठी मैदानात उतरला आहे. मेलबर्न क्रिकेट ग्राउंडच्या मैदानात रंगलेल्या या सामन्यात कॅप्टन्सह अनुभवी केएल राहुल, अभिमन्यू ईश्वरन या मंडळींनी नांगी टाकल्याने भारतीय संघ अडचणीत सापडला होता. ६४ धावांत अर्धा संघ तंबूत परल्यानंतर ध्रुव जुरेल याने लढवय्या वृत्ती दाखवून देत ऑस्ट्रेलियन मैदानात भारतीय संघाची लाज राखली.



भारत 'अ' संघ शंभरीच्या आत गुंडाळेल अशी परिस्थिती निर्माण झाली असताना ध्रुव एकटा ऑस्ट्रेलियाला भिडला. त्याने १८६ चेंडूंचा सामना करत ८० धावांची आश्वासक खेळी करत संघाच्या धावफलकावर सन्मानजनक धावसंख्या उभी केली. त्याने आधी देवदत्त पडिक्कल आणि त्यानंतर नीतीश रेड्डीच्या साथीने डावाला आकार देत संघाची धावसंख्या १५०पार नेली.

ऑस्ट्रेलिया 'अ'विरुद्धच्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरलेल्या भारतीय 'अ' संघाची सुरुवात खूपच खराब झाली. संघाच्या खाते उघडण्याआधी दोन गडी तंबूत परतले होते. सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन तीन चेंडूचा सामना करत शून्यावर माघारी फिरला. त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या साई सुदर्शनला खातेही उघडता आले नाही. संघाच्या धावफलकावर नऊ धावा असताना लोकेश राहुलच्या रुपात संघाला दुसरा धक्का बसला. त्यानंतर ११ धावांवर ऋतुराज गायकवाडनंही तंबूचा रस्ता धरला. दोघांनी प्रत्येकी चार धावा केल्या.

ऑस्ट्रेलिया 'अ' विरुद्धच्या सामन्यात संघ संकटात असताना ध्रुव जुरेल एकटा लढताना दिसला. विकेट किपर बॅटरने देवदत्त पडिक्कलच्या साथीने ५३ धावांची भागीदारी रचली. त्यानंतर ध्रुवने नितीश रेड्डी आणि तळाच्या फलंदाजांच्या साथीने ९१ धावांची भर घालत संघाची धावसंख्या १६१ धावांपर्यंत नेली. प्रसिद्ध कृष्णाने १४ धावा केल्या.

## रागाच्या भरात खेळाडू गेला मैदानाबाहेर

**ब्रिजटाऊन : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसऱ्या वनडे सामन्यात एक विचित्र घटना पहायला मिळाली. ब्रिजटाऊनमध्ये खेळल्या गेलेल्या मॅचमध्ये वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफ हा कर्णधार शाई होपवर भडकला. इतकेच नव्हे तर तो रागरागात चालू सामना सोडून मैदानाबाहेर निघून गेला. त्यामुळे संघाला काही वेळ १० खेळाडूंबरोबर सामना खेळवा लागला.

चौथ्या षटकात अल्झारी जोसेफ गोलंदाजीसाठी आला. त्याने पहिला चेंडू आऊट साइड, बॅक ऑफ लेन्थवर टाकला. यानंतर एक स्लिप काढून पॉइंटवर ठेवण्याची मागणी केली, पण कर्णधार शाई होपने त्याचे ऐकले नाही. जॉर्डन कॉक्सला झेलबाद केल्यानंतर जोसेफ आणि वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप यांच्यात जोरदार वादावादी झाली होती. नंतर जोसेफ आला. हा सामना विंडीजने जिंकून मालिकाही जिंकली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com